# ग्रामज्योती

वार्षिकांक २०१८-१९




स्व. दत्तात्रय पुसदकर शिक्षण संस्था, अमरावती द्वारा संचालित

नॅकद्वारा 'ब' दर्जा मानांकित

## स्व. दत्तात्रय पुसदकर कला महाविद्यालय

नांदगाव पेठ, ता. जि. अमरावती.

स्व. दत्तात्रय पुसदकर शिक्षण संस्था, बुधवारा, अमरावती द्वारा संचालित

# स्व. दत्तात्रय पुसदकर कला महाविद्यालय

नांदगाव पेठ, ता. जि. अमरावती.

नॅक तर्फे 'ब' दर्जा मानांकित

# ग्रामज्योती

## वार्षिकांक २०१८-१९

प्रकाशक

**प्राचार्य डॉ. व्ही. डी. दरणे**

मुख्य संपादक

**प्रा. डॉ. पंकज डी. मोरे**

# Late Dattatraya Pusadkar Arts College

Nandgaon Peth, Tq. Dist. Amravati.

**Accredited 'B' Grade by NAAC**

## VISION

To educate, groom and inspire the rural youths to be the nationalist citizens who would strive to be equipped with highest ethical, ideological, philosophical and intellectual honesty and integrity in their private, public and professional endeavours.

## MISSION

To strive to produce self reliant, promising and motivated citizens from rural area committed to contribute their worth in the endeavours of healthy Nation-Building by ensuring the sustenance and enhancement of quality culture of education in the institution.

## GOALS

- To ensure credibility, dependability and transparency in various academic and administrative processes.
- To create a learner-centric environment conducive to quality education.
- To promote and motivate faculty to acquire knowledge and technological skills for making teaching and learning processes participatory.
- To evolve a feedback mechanism for students, parents and other stakeholders on quality related institutional processes.
- To evolve a healthy educational culture by organizing inter and intra institutional workshops, seminars on quality related themes.
- To ensure quality improvement by meticulously implementing and documenting various institutional activities.

## OBJECTIVES

- To work for the welfare of the common people.
- To prevent atrocities against the ordinary people.
- To promote social, educational and cultural activities for the development of the members of the society.
- To create awareness among the people about superstitious beliefs.
- To conduct Youth Leadership Training Camps, Health Education Programmes, Learning Camps, Literary Meets and various other time relevant socio-cultural competitions.
- To work for the empowerment of women.
- To provide educational facilities for differently abled children.
- To conduct adult education programmes.
- To provide environmental awareness programmes.
- To provide training and industrial programmes for the youth.

## * आमचे श्रध्दास्थान *



स्व. दत्तात्रय विठ्ठलराव पुसदकर



## मा. श्री. सोमेश्वरजी पुसदकर

अध्यक्ष
स्व. दत्तात्रय पुसदकर शिक्षण संस्था, अमरावती.

माजी सदस्य, व्यवस्थापन परिषद
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.

# From the Principal's Desk



It gives me an immense pleasure that we are going to publish our Annual Magazine 'Gramjyoti' 2018-19.

Gramjyoti is itself a basket of our student's literary innovations that spreads a fragrance of the literary thoughts and poetical ideas of students in Marathi, English & Hindi.

Our institution is located in rural area we endeavour strongly to impart innovative facilities of higher education to students, so that they may seek their employment in various sectors.

Hard work of the teachers in learning and teaching process place the college students in merit rank of the university since 2002. This year by keeping the meritorious tradition we have four students in merit list of university with one gold in History.

With the adhesive support of the college management, we will ensure that the institution will become an ideal institution in future and serve the students in particular and society at large.

I would like to congratulate the Editorial Board of 'Gramjyoti' by their continuous effort it becomes ready to read. I put my sincere gratitude towards the managing body that without their sublime guidance we would not be able to complete 'Gramjyoti'.

Thank you.

Dr. V. D. Darne
Principal



संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या उन्हाळी-२०१८ च्या
वाङ्मय स्नातक (बी.ए.) परीक्षेत
गुणवत्ता यादीत स्थान प्राप्त केल्याबद्दल
हार्दिक अभिनंदन
कु. भावना वि. ठवळी
दुसरे स्थान
विशाल वा. तायडे
चवथे स्थान
रोशनी श्री. पोकळे
आठवे स्थान
कु. शीतल सु. देशमुख
दहावे स्थान




संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या उन्हाळी-२०१८ च्या वाङ्मय स्नातक (बी.ए.) परीक्षेत
दुसरे स्थान प्राप्त केल्याबद्दल रोख पारितोषिक स्वीकारताना कु. भावना वि. ठवळी व
इतिहास विषयात सर्वाधिक गुण प्राप्त केल्याबद्दल सुवर्ण पदक स्वीकारताना विशाल वा. तायडे
पुसदकर कला महाविद्यालयाचे चार विद्यार्थी गुणवत्ता यादीत
पुसदकर महाविद्यालयाचे चार विद्यार्थी गुणवत्ता यादीत
स्व.दत्तात्रय पुसदकर कला महाविद्यालयाचे चार विद्यार्थी गुणवत्ता यादीत

# संपादक मंडळ



प्रा. डॉ. पी. आर. जाधव
मराठी विभाग



प्रा. डॉ. गोविंद तिरमनवार
हिंदी विभाग



प्रा. डॉ. पंकज मोरे
इंग्रजी विभाग



प्रा. विकास अडलोक
मुखपृष्ठ व अंतर्गत सजावट

# विद्यार्थी संपादक मंडळ



कु. चैताली पचारे
बी.ए.भाग - ३
मराठी विभाग



कु. स्नेहल मुळे
बी.ए.भाग - ३
हिंदी विभाग



कु. धनश्री राजगुरे
बी.ए.भाग -३
इंग्रजी विभाग

# संपादकीय.....

२०१८-१९ चा वार्षिकांक 'ग्रामज्योती' आपल्या हाती देताना आम्हाला अतिशय आनंद होत आहे. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या भावनांना शब्दबध्द करुन त्या भावना वार्षिकांकात उमटविणे आणि त्याद्वारे विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांना वाव द्यावा हा वार्षिकांक काढण्यामागचा हेतू.

वार्षिकांक म्हणजे विद्यार्थी वर्गाचे लेखन कौशल्य विकसीत करणारा उपक्रम. भाविष्यातील प्रतिभावंत लेखक, कवींच्या निर्मितीसाठीचा प्रयत्न. आपणही काहीतरी लिहू शकतो, मांडू शकतो हा आत्मविश्वास याद्वारे विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होतो. आपल्या भावभावनांना शब्दबध्द करुन ते ग्रामज्योतीत मांडणाऱ्या प्रतिभावंताचे मनःपूर्वक अभिनंदन.

मराठी, हिंदी आणि इंग्रजी आदी भाषेतील हा वार्षिकांक वाचनीय आहे. प्राप्त झालेले सर्व साहित्य प्रकाशित करण्याचा प्रयत्न केला आहे. जागेअभावी ज्यांना स्थान मिळू शकले नाही त्यांनी नाउमेद न होता भविष्यात प्रयत्नरत राहावे.

आज समाजात वाढत चाललेल्या स्त्री-भ्रूण हत्येमुळे मानव जात फार कलंकीत होत आहे. या संदर्भातील अनेक घटना सतत पुढे येत आहेत. स्त्री-भ्रूण हत्या थांबावी, स्त्रीला समाजात मानाचे स्थान मिळावे, स्त्री ही कुटुंबाची आणि समाजाची उद्धारकर्ती आहे. म्हणून तीला फुलाप्रमाणे फुलू द्यावे, उमलू द्यावे. कळीत किंवा फुलात तीचे रुपांतर होण्याआधीच तीला कुस्कारुन टाकू नये असा संदेश अनेक कथा व कवितांमधून मिळतो. आज संपूर्ण महाराष्ट्रामध्ये दुष्काळजन्य परिस्थिती आहे. प्रचंड वृक्षतोड, प्रदूषण, पाण्याचा अनिर्बंध वापर यामूळे पृथ्वीवरील जैवविविधता नष्ट होत आहे. मानवी जीवन समृद्ध व सुंदर होण्याकरिता पाणी वाचविणे तसेच वृक्षसंवर्धन करणे काळाची गरज आहे, म्हणून 'पाणी वाचवा जीवन वाचवा' असा संदेश या वार्षिकांकाच्या मुखपृष्ठातून देण्यात आलेला आहे.

'ग्रामज्योती' वार्षिकांक तयार करीत असताना आमच्या संस्थेचे अध्यक्ष तथा संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे माजी सदस्य मा. श्री. सोमेश्वरजी पुसदकर, सचिव मा. श्री. श्रीकृष्णजी बाळापुरे, उपाध्यक्ष मा. श्री. निदानजी बारस्कर, कोषाध्यक्ष मा. श्री. ज्ञानेश्वरजी हिवसे यांचे प्रोत्साहन आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय दरणे यांचे मार्गदर्शन वेळोवेळी लाभले. महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य तसेच महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. विकास अडलोक यांनी या वार्षिकांकाच्या सुंदर, सुबक मांडणी व छपाई साठी केलेले विशेष प्रयत्न यामुळे हा अंक आकारास आला. या सर्वांचे आभार.

आमच्या सर्वांच्या प्रयत्नातून साकारलेल्या 'ग्रामज्योती' वार्षिकांकाचे आपण मनापासून स्वागत कराल, अशी आशा !

- संपादक मंडळ

ग्रामज्योती २०१८-१९

# मराठी विभाग

# आकांक्षापुढती जिथे गगन ठेंगणे



कु. धनश्री राजगुरे
बी.ए. भाग ३

''महत्वाकांक्षा असल्याशिवाय माणूस परिश्रम करत नाही आणि परिश्रम केल्याशिवाय महत्वाकांक्षा पूर्ण होत नाही.''

आपल्या महत्वाकांक्षेला कृतीची जोड असावी असं म्हणतात हे अगदीचं सत्य आहे. आपल्या विचारांची दिशा नक्की कशी असावी. आपण त्याच मनन-चिंतन करत असतो. त्याचा वृत्तीवर ठसा उमटवत असतो. त्या ठशानुसार आपण आपली कार्ये करत असतो. म्हणून आपण करत असलेलं मनन-चिंतन हे कायम सकारात्मक विचाराचंच असाव. परिश्रमाच्या फांदीवर यशाचं फूल उमलू दयायचं असेल तर आपल्यात महत्वाकांक्षा प्रभावी असायला हवी. आपल्या मनगटातून बहरलेल्या घामाच्या गंधाचं कर्तृत्व आज हवं आहे नशिबाची चाकरी करण्यापेक्षा कर्तृत्वाला आपल्या हाताखाली बाळगावं पण आपण असं करतो का? उलट आपण आपल्या नशिबालाच दोष देत बसतो. एक साधं उदाहरण बघा ''छोट्याशा चिमणीचं ! चिमणीला गरुडा इतकं उडता येत नाही, म्हणून ती उड्याचं सोडत नाही उलट तिच्यात असलेल्या प्रचंड महत्वाकांक्षेनं ती एक ना एक दिवस भरारी घेतेच अगदी तसचं आपल्याही आयुष्यात घडलं असतं बरेचदा आपल्याही पदरी अपयश येतं पण, म्हणतात ना अपयश ही यशाची पहिली पायरी आहे. मग आपल्याला आलेल्या अपयशामुळे आपण निराश होतो. वेळ प्रसंगी खचूनही जातो. आता सगळं संपलं आहे. असं जेव्हा वाटू लागतं तेव्हा आपण प्रयत्नच करायचं थांबतो. यश त्यानांच मिळते ज्यांची इच्छाशक्ती प्रबळ असते ज्या प्रमाणे पाणी धावतं म्हणून त्याला मार्ग सापडतो तसंच आपल्यालाही यशाचा मार्ग गवसतो खरा.

आपली वाट आपल्यालाच शोधायला हवी या संदर्भात एक गोष्ट आठवते. एकदा एक सज्जन गृहस्थ आपल्या अंधाऱ्या काळोख्या खोलीत काही धडपड करत असतो. प्रथम हातवारे झाले. मग त्यांनी एक बादली घेतली आणि खोलीतले काही तरी उपसून खिडकीतून बाहेर टाकू लागले. हे सर्व पाहणाऱ्या शेजाऱ्याला काहीच कळेना रिकाम्याच बादलीतून हे काय फेकताय ? अशा तो स्वत:च विचार करु लागला. काही वेळानंतर त्यानं त्या सज्जन गृहस्थाला प्रश्न विचारला, अहो काय करतायं तुम्ही हे ? त्यावर गृहस्थ म्हणाले काय सांगायचं केवढा काळोख भरला आहे. खोलीत तो उपसून बाहेर एकतोय तो हटला की, जरा लिखाण वाचन करेन म्हणतो.

आपण सर्वच जाणतो की अंधार नाहीसा करण्याचा हा काही मार्ग नाही सांगायचा मुद्दा हाच की अनुकूल परिस्थितीतही आपण मार्ग शोधायला हवा. आपल्याजवळ असलेले क्षण असे निष्क्रिय पण वाया न घालवता येणाऱ्या प्रत्येक क्षणाचं असायला हवं यशाची पहिलीच पायरी चढताना जर निराशा पदरी पडली तर स्वत:ला सतत सांगत राहायचं की, अजूनही आयुष्याचं पूर्ण सार बाकी आहे. आपण चालतोय आपल्या ध्येय पूर्तीकडे आपण पहिल्या पानावर आहोत, अजून संपूर्ण पुस्तक बाकी आहे.

यशाचा मार्ग हा अवघड असतो. खरा पण तो अशक्यच असेल असं काही नाही प्रयत्नशील राहणं सातत्य आणि धीर जर कायम असेल तर आपल्यापासून आपलं ध्येय किती ही दूर असू देत ना .... ते नक्कीच आपलं होतं. मनात

नेहमी जिंकण्याची आशा असली म्हणजे आपल्याला हे आकाशही ठेंगण वाटू लागलं ...

''तोरण बांधा धारिष्ठ्याचे
तोरण बांधा नवतेजाते.''

अंधारातून प्रकाशात येण्या तोरण होईल तारण रे. कवी विंदा करंदीकर यांच्या कवितेचं एक कडवं आठवतंय ते आवर्जून सांगावसं वाटतं.

''असे जगावे दुनियेमध्ये
आव्हानाचे लावून अत्तर
नजर रोखूनी नजरेमध्ये,
आयुष्याला द्यावे उत्तर
नको गुलामी नक्षत्रांची,
भीती आंधळी ताऱ्यांची,
आयुष्याला भिडतानाही,
चैन करावी स्वप्नांची,
असे दांडगी इच्छा ज्याची,
मार्ग तयाला मिळाली सत्तर,
नजर रोखुनी नजरे मध्ये,
आयुष्याला द्यावे उत्तर ....

*****



## चंद्र चांदणी

सारे आईचे गुण गाती
बापाला कमी लेखती
त्यांचा धर्म विसरती
त्यांच्याविणा नाही निर्मिती

आई बाप समान
आईला दया सम्मान
तर बापाचा करु
नका अपमान
आई धनुष्य
तर बाप बाण

आई डोळे बाप कान
आई श्वास बाप प्राण
आई लेकरांची तहाण
तर बापाला कमाईचा ताण

आई करते स्तनपाण तर
बाप करतो रक्तदान
लेकरे हीच दोघांची शान
मुलगा मुलगी त्यांना एक समान

आई बाप कर्माने महान
त्यांना आहे निसर्गाचे वरदान
आई चांदणीचा मान
तर बापाला चंद्राची शान

**कु. दुर्गा डोईफोडे**
बी.ए. भाग १

# स्त्री आज काल आणि उदया



**कु. चैताली पचारे**
बी.ए. भाग ३

प्राचीन काळी भारत स्त्री प्रधान देश होता. शेतीचा शोध सुध्दा स्त्रीनेच लावला. त्यावेळी कुटुंब प्रमुख म्हणून तीला मानाचे स्थान होते. त्यावेळी नवरा नवरीकडे नांदायला जात असे. कालांतराने परकीयांनी येथील मुळे निवासस्थानावर आक्रमण केल्यानंतर येथील आदिवासी यांना पराभव पत्करावा लागला. कारण आर्याकडे तिक्ष्ण धारदार धातुचे हत्यार व घोडे होते. तसेच आर्य दिसायला गोरे गोमटे व चाणाक्ष बुध्दीचे त्यांनी त्यांच्या कपट नितीने येथील मुळनिवासस्थानावर त्यांची संस्कृती लादली व मानसिकरित्या येथील लोकांना गुलाम केले. स्त्रीला नखापासून ते केसापर्यंत विविध शृंगारीक बंधनात अडकवून स्त्री फक्त पुरुषाची सर्व प्रकारच्या मानसिक, शारीरिक उपयोगाची वस्तू म्हणून तीच्या मनावर बिंबवण्यात आले. त्यातूनच देवदासी, सती, मुरली, वारांगण इत्यादी प्रथा तमाम भारतीयांच्या समाजात रुढ झाल्या. या अंधश्रध्दायुक्त प्रथा तमाम भारतीयांच्या मनात इतक्या खोलवर रुजविल्या की हजारो वर्षाच्या कालांतरानंतर देखील कुप्रथा आजच्या वैज्ञानिक युगात लोकांच्या मनात रुजलेल्या आहेत. जसे चित्रपट, नाटक, मालिका, प्रिंट मिडीया, इंटरनेट इत्यादीच्या माध्यमातून स्त्रीला पुन्हा खालचा दर्जा प्राप्त करुन देण्यासाठी सज्ज झाले आहेत आणि त्यांच्यात सहभागी होवून स्त्रीया त्यांना प्रोत्साहन देत आहेत. म्हणून माझी सर्व महिलांना विनंती आहे की, त्यांनी टी.व्ही. वर दाखविल्या जाणाऱ्या ओजारणाऱ्या, गोंजारणाऱ्या अंधश्रध्दावादी मालिका पाहू नये, कुण्या ढोंगी साधू बाबांच्या नादी लागू नये जास्तीत जास्त शिकावे, मुलींना शिकवावे पुरोगामी, विज्ञानवादी, विचारसारणी समोर ठेऊन आपल्या भारत देशाला अंधश्रध्दामुक्त देश बनविण्याकरता सहकार्य करावे व स्त्रीने पुरोगामी चळवळीत हातभार लावून बहुजन हिताचे कार्य करावे.

महाराष्ट्रातील कोणत्याही कानाकोपऱ्यातील स्त्री ''चूल आणि मूल'' संकल्पनेतून मुक्त झाली आहे का? याचे उत्तर ग्रामीण आणि शहरी भागात थोड्या फार फरकाने वेगळे आहे. पुरुष वर्ग, समाज आणि निसर्गाने 'स्त्री' वर दिलेल्या जबाबदाऱ्या याचा विचार केला तर स्त्री मूक्त झालेली नाही. उलट तिची जबाबदारी आणि तिचे काम वाढले आहे. नोकरी आणि घरची जबाबदारी पार पाडताना पगार नसलेला ओव्हर टाईम स्त्री सध्या करत आहे. मात्र एक आहे की, त्या बदल्यात तिला 'आई' या गोड शब्दाचे प्रेम मिळते. पूर्वी स्त्री म्हणजे घर आणि चूल इतकेच मर्यादित विश्व होते. परंतु हळूहळू हे चित्र बदलले स्त्री शिकली, सवरली स्वतःला ओळखायला लागली. उंबरठ्याबाहेर पडली आज असे एकही क्षेत्र नाही की जिथे 'स्त्री'चा वावरत नाही. पण 'पण' या शब्दांनंतर खरी कहाणी सुरु होते. तिचं रुप बदललं खर परंतु एक गोष्ट बदलत नाही ती म्हणजे 'चूल आणि मूल' तिच्यासोबत तशीच चाल आलेली आहे. स्वतःचं करीयर घडविताना घर आणि करिअर अशी दुहेरी भूमिका तिला करावी लागते. थकलेला जीव अंथरुणावर टाकावा तर दुसऱ्या दिवशीच्या कामाची घोडदौड डोक्यात सुरुच असते, असं हे स्त्रीचं धावपडीच जगणं स्त्री आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी झाली. प्रत्येक क्षेत्रात स्वतःची तिने ओळख निर्माण केली. पण 'चूल आणि मूल' ही सोनसाखळी काही तिला काढता आलेली नाही. अपवाद म्हणून काही स्त्रियांच्या बाबतीत असेलही आज स्त्री घराबाहेर पडल्याने तिचे अनुभव विश्व समृध्द झाले. पण तिला घर चालविण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागते. आजच्या स्त्रीची ताकद जबरदस्त वाढली आहे. ती शिक्षण घेते. विविध प्रकारची नोकरी करते पण अजूनही घराची जबाबदारी मात्र तीच उचलते. शिवाय मुलांचा अभ्यास, त्यांच्या भवितव्याची जडणघडण यांचा भारही स्त्रीने स्वतःवरच घेतला आहे. स्त्रीला आपण घराकडे लक्ष देऊ शकत नाही. याबद्दल अपराधीपणाची भावना असते. या उच्च विचाराला पुरुष साथ देईल का ? प्रश्नच आहे खरे तर घर दोघांचे असते. बालसंगोपन असो किंवा घरातील कोणतीही जबाबदारी असो त्यासाठी स्त्रीलाच गृहित धरले जाते. जर घर संसार नोकरी हे दोघांचे असते तर जबाबदाऱ्या या पर पाडताना दोघांचाही सहभाग हवा पण तसे घडत नाही. दोघही नोकरी करुन आले की आई चुलीजवळ

आणि पुरुष पेपर वाचतात. असे बऱ्याचवेळा दृश्य पहायला मिळते. घरासाठी, मुलांसाठी अनेकवेळा स्त्री साऱ्या जबाबदाऱ्या सांभाळते. एवढेच नव्हे तर घरातील धुनी, भांडी करुन घडाळ्याच्या काट्याप्रमाणे प्रत्येक सेकंदाला महत्व देवून कामे आटोपून कामावर जाण्यासाठी बाहेर पडणारी प्रवासात तिला थकवा आलेला असतो आणि त्यातच धापा टाकत कार्यालय गाठते. एवढे सर्व करुन दमून भागून गेलेल्या स्त्रीला थोडा उशीर झाला की वरिष्ठांच्या बोलणे ऐकावे लागतात. म्हणजेच स्त्रीयांना बाहेर सुध्दा व घरीसुध्दा अपमान सहन करावा लागतो.

अनेक काळापासून स्त्री आणि पुरुष यांची कामे घर कुटुंब, समाज मध्ये ठरवून दिली गेली आहेत. पुरुषाने संरक्षण करावे, अन्न मिळवून आणावे, स्त्रीने घर, मुले सांभाळावीत तसेच अन्न शिजवून वाढावे. 'रांधा-वाढा-उष्टी काढा' ही म्हण खरोखरच वाखणण्याजोगी आहे. स्त्रीला हे करावेच लागते. 'स्त्री' वर निसर्गाने सोपवलेले एक नितांत सुंदर काम म्हणजे प्रजनन ! अनेक वेदनामधून जन्माला आलेलं गोडस बाळ, जन्मानंतर बाळाशी असणारी स्त्रीची शारीरिक, भावनिक, मानसिक गुंतवणूक इतकी प्रचंड असते की स्त्री स्वतंत्र झाली असे तिला व समाजाला वाटते. पण तो विचार फक्त भ्रम असतो. तसेच आजच्या काळात दोघांनी नोकरी करणे गरजेचे आहे यात शंका नाही. स्त्रीला चूलीजवळ कामे करावीच लागतात. स्त्रीच्या बाबतीत 'रोज मरे त्याला कोण रडे' अशी अवस्था झाली आहे. आठवड्याच्या एकमेव सुट्टीला घरातील सर्वजन मग मुले आणि नवरा दोघांकडून अपेक्षा ठेवल्या जातात. त्या स्त्रीची ती आठवड्याची एक सुट्टी आहे. याचा विचार केला जात नाही. रोज आठवड्याभरात तेच जेवण खावून कंटाळा आलाय ! आज सुट्टी आहे ! छान काहीतरी खायला वेगळ कर ! अशी फरमाईश केली जाते खरचं स्त्रीची शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या 'चूल आणि मूल' यातून आजही सुटका झालेली नाही आणि होवू ही शकणार नाही. एवढे सगळे पेलण्याची प्रचंड क्षमता समाजाला दाखवून दिले आहे.

*****

## पावसाचं गाणं

बरसतील धुंद आता पाऊसधारा
भिजेल चिंब चिंब आसमंत सारा
तहानलेल्या मनांना सुखाविल
टप टप थेंबांच येण
धरतीही गाईल मग पावसाचं गाण
गंध पहिल्या पावसाचा
वेड लावितो जिवा
मातीचे ते गीत ओठी देह अवघ्या गारवा
शिरवा पहिल्या पावसाचा दरवळतं नव्या
नव्या सुगंधात
हिरवगार एक स्वप्न उभारी घेतं धरतीच्या मनात
अबोल शब्दांना तो सूर लावतो
थोडा खुलवतो
थोडा झुलवतो
आकांक्षांना तो पंख लावतो
ओजंळीत साठलेल्या तळ्याखाली
स्वप्नांचे तो गाव बांधतो.

**कु. वृषाली दुबे**
बी.ए. भाग १

## आठवण

स्वप्नात फक्त तुझ्याशीच नाती जोडली आहे
तुझीच आठवणी जणू अंगावर ओढली आहे
यावी तू परतुनी पुन्हा भिजण्यासाठी त्या
पावसात म्हणून
एक प्रेम पत्राची होडी बनवून
पाण्यात सोडली आहे.

**कु. निकिता शिंदे**
बी.ए. भाग १

# कन्यादान



**कु. पुजा चिरडे**
बी.ए. भाग ३

बाप आणि लेक हे नाते शब्दात मांडणे कठीण. बाबा हा शहाळ्यासारखा असतो. बाहेरुन कितीही कठोर असला तरी आतून मात्र नितळ आणि मधूर पाण्याचा झरा असतो. कुठलीही मुलगी जर डोळे झाकून एखाद्या पुरुषावर विश्वास ठेवू शकते. तर तो फक्त तिच्या वडिलांवर लेक जर घराचे सौख्य असेल तर त्या सौख्याचे पवित्र्य तिचा बाप असतो. संस्कार देणारी आई असली तरी ते संस्कार जपणारा बाबा असतो. संयम देणारी आई असली तरी खंबीर बनविणारा बाबाच असतो. बोट धरुन चालायला शिकविणारा बाबाच असतो.

लेकीच्या हट्टासाठी घोडा होणाराही बाबा असतो. कामावरुन येताना रोज न चुकता खाऊ आणणाराही बाबाच असतो. पिकनिकसाठी पण पैसे बाबाच देतो. खरेदी करतांना आईने कमी किमतीचा ड्रेस काढला तर हळूच लेकिला विचारुन भारी किमतीचा ड्रेस घेणारा सुध्दा बाबाच असतो. आईने काही काम सांगितले तर तिला दटावणारा सुध्दा बाबाच असतो. लेकीचे पहिले बोबडे बोल, तिने टाकलेले पहिले पाऊल, तिचे लाडीक वागणे, तिची घरभर पैजंनाची छुमछुम हे सगळे पाहून सुखावतो तो बाबा असतो. आणि लेकिला नाजूक कळी सारखा सांभाळणारा आणि प्रसंगी राग भरणारा पण बाबाच असतो; पण त्यात त्याची लेकीसाठीची तळमळ असते. तिच्यासाठी काळजी असते. लेकीच्या प्रत्येक सुखासाठी झटणाराही बाबाच असतो. मात्र शेवटी मुलगी म्हणजे परक्याचे धन हे कटू सत्य पचवणाराही बाबाच. ज्या लेकीला २०-२५ वर्षे जीवाच्या पलीकडे सांभाळले. तिला एका क्षणात परक्याच्या हातात देताना त्याचे हृदय काय तुटत असेल याची कल्पनाही करता येणार नाही. आर्त धागे तुटल्याची ती वेदना कोणीच समजू नाही शकणार. आपल्या लेकिला माहेरचा उंबरठा ओलांडून सासरी जाताना पाहताना ठसाठसा रडणाराही बाबाच असतो. आपल्या लेकीचा हात परक्याच्या हाती देताना आतुन तुटणारा बाबाच असतो.

दिल्या घरी सुखी रहा म्हणताना मनातून खचलेलाही बाबाच असतो. असा हा बाबा त्याच्या लेकीचे सर्वस्व असतो आणि फक्त लेकच तिच्या बाबाचे मन ओळखू शकते. लेकीच्या स्वत:पेक्षा जास्त विश्वास तिच्या बाबावर असतो. लग्नानंतर मुलीचे नाव जरी बदलले तरी तिचे बाबाबरोबरच नाते कधीच बदलत नाही. ती शेवटपर्यंत तिच्या बाबाची छोटी परीच असते. एक गोडस परी लक्षात ठेवा.

''मुलगा वारस आहे, मुलगी पारस आहे''
मुलगा वंश आहे, मुलगी अंश आहे
मुलगा आन आहे, मुलगी शान आहे
मुलगा तन आहे, मुलगी मन आहे
मुलगा संस्कार आहे, मुलगी संस्कृती आहे
मुलगा आग आहे, मुलगी दुवा आहे
मुलगा भाग आहे, मुलगी सौभाग्य आहे
''मुलगा गीत आहे, मुलगी संगीत आहे''

लेक वाचवा ! लेक वाढवा ! लेक घडवा ! हे सगळे करणारा तुझा बाप विशाल आहे. ज्यांना मुलगी नाही त्यांनी सुनेला जीव लावावा व आपल्या लेकीसारखा तिचा सांभाळ करावा. हे सुध्दा म्हणणारा बाबाच आहे.

*****

## चूक कोणाची

स्थिती अशी सतत बदलत असते.
कलाटणी घेत असते.
सगळे दिवस सारखे नसतात.
काही दिवस हसवतात तर काही दिवस रडवतात.
नियती खेळवते आणि आपण खेळत राहतो.
तिने हसवलं की हसतो आणि
तिने दु:खाचे चटके दिले की रडतो.
मी म्हणणारे देखील एखादया
कळसूत्री बाहुलीप्रमाणे नियतीच्या
इशाऱ्यावर नाचत असतात. म्हणूनच
शायर म्हणतो त्याप्रमाणे डोळ्यात
पाणी येणं, एखादयाशी संवाद हरपणं,
नात्यामध्ये दरी निर्माण होणं याला
प्रत्येकवेळी आपणच जबाबदार असतो.
असं नाही. हा नियतीचा खेळही असू शकतो.
वेळ फिरली की आपल्या कोणत्याही
कृतीचा, उक्तीचा चुकीचा अर्थ लावला जातो.
त्यावरुन चुकीचे तर्क वितर्क लढवले जातात.
एखादी गोष्ट विनाकारण आपल्या अंगलट येते.
विनाकारण आपल्याला वाईटपणा दिला जातो.
मुख्य म्हणजे हे सर्व हताशपणे बघण्याशिवाय
आपण काही ही करु शकत नाही.

**कु. गौरी खरीपकार**
बी.ए. भाग २

## आयुष्य

आयुष्यभर सोबत असून
जवळ कधी बसत नाही
एकाच घरात राहून आम्ही
एकमेकास दिसत नाही.
हरवला तो आपसातला
जिव्हाळ्याचा संवाद
एकमेकास दोष देवून
नित्य चाले वादविवाद
धाव धाव धावतो आहे
दिशा मात्र छळत नाही
हृदयाचे पाऊल कधी
हृदयाकडे वळत नाही
इतकं जगून झालं पण
जगायलाच वेळ नाही
जगतो आहोत कशासाठी
काहीच कसला मेळ नाही
क्षण एक येईल असा
घेवून जाईल हा श्वास
अर्ध्यावरंच थांबलेला
असेल जीवन प्रवास.
अजूनही वेळ आहे
थोडं तरी जगून घ्या
सुंदर अशा जगण्याला
डोळे भरुन बघून घ्या.

**कु. पार्वती पवार**
बी.ए. भाग २

# प्रेमाला प्रेमाची साथ हवी



**कु. सुचिता रायकर**
बी.ए. भाग ३

प्रेम तर सगळेच करतात. प्रेमाची व्याख्या एकच आहे. सरळ आणि सोप्या भाषेत प्रेम सांगायचे तर आपल्या व्यक्तीला सुधारण्यासाठी आपण गुण दोषांसह स्वीकारावे. दोष बाजूला सारुन गुणांचा विकास करुन त्याला गुणांचा विकास करुन त्याला योग्य मार्गावर आणणे म्हणजे प्रेम होय, हे मत माझे वैयक्तिक मत असून प्रत्येक जन सहमत असेलच असे नाही. परंतु आपण प्रेमाचा विचार केला तर आपल्याला प्रेम करायला शिकवणारी आई आपल्या गुणदोषासह आपला स्वीकार करुन सतत आपल्यात सकारात्मक बदल व्हावा या उद्देशाने संस्कार घालते. भावाने बहिणीवरचे प्रेम, वडिलांचे मुलावरील प्रेम, मित्राचे मैत्रीवरील प्रेम या समाजाने मान्य केले असले तरी आजही या समाजाची मित्राचे मैत्रिणीवरील प्रेम किंवा मैत्रिणीचे मित्रावरील प्रेम आजही मान्य केले नाही. आणि त्याला कारणेही तशीच आहेत. आजच्या युवा पिढीने प्रेमाची परिभाषाच बदलून टाकलेली आहे. आज प्रेम म्हणजे फक्त सिनेमा पाहायला जाणे. कँटीनमध्ये बसून मोठमोठ्या आवाजात गप्पा मारणे, एकत्र येऊन धिंगाणा घालणे, नाचणे, गाणे आणि फक्त शारीरिक सुख घेणे हीच आज प्रेमाची व्याख्या झालेली दिसते. शरीर सुखासाठी एकत्र येणे, हॉटेलवर जाऊन जेवणे, कॉलेज, कामाच्या नावाखाली तिच्या किंवा त्याच्या सोबत फिरणे याला प्रेम म्हणूच शकत नाही.

आज आपण समाजातील युवकांचे परीक्षण केले तर कामधंदा न करता रिकामा वेळ घालवणे, मोबाईल वर तासंतास बोलणे, तहान भूक विसरुन रात्रभर मोबाईलवर चॅटींग करणे, आपल्या जोडीदाराला भेटायला बोलावणे, जोडीदार नाही आता तर भांडण करणे हेच प्रेमाच्या नावाखाली सुरु आहे. म्हणून समाजाचा अर्थात जेष्ठ लोकांचा प्रेमावरचा विश्वास उडाला आहे. याच युवा वर्गाने प्रेमाला फक्त लफड्याचे स्वरुप देऊन प्रेम या नावाचाच अवमान प्रत्येक वेळी केला आहे. प्रेम जीवनात आवश्यक आहे परंतु प्रेमाच्या नावाखाली व्यभिचार हा नसायलाच पाहिजे. आज व्यभिचार वाढलाय म्हणून प्रेम बदनाम झालेय. एखादया व्यक्तीने किंवा युवकाने एकमेकांना प्रपोज केले तर सात दिवसाच्या आत शरीर सुखाची मागणी करतात, हे प्रेमाच्या कक्षेत ना भुतो ना भविष्य बसणारच नाही. प्रेम म्हणजे त्याग आहे भोग नाही. भोगाची मानसिकता डोक्यात घेऊन प्रेम करणारे युवक निर्माण झाले म्हणून प्रेम बदनाम तर झालेच परंतु आईवडिलांच्या संस्कारावर लोक प्रश्नचिन्ह निर्माण करायला लागले. आपल्या एका चुकामुळे प्रेम पूर्ण उद्ध्वस्त होत आहे. आजही प्रेम नावाची भीती अनेक पालकांना व प्रेमात भोगाला बळी पडलेल्या परंतु खरे प्रेम उशीरा बाळगून साथीदाराने फसविणाऱ्या मुलींना वाटत आहे. प्रेमाची एवढी निर्मळ प्रतिमा मलीन करुन आज युवा पिढी बिनधास्त वागत आहे.

युवक–युवतींनी प्रेम म्हणजे काय हे समजून घेणे महत्वाचे आहे. शरीर सुख बाजूला सारुन आदर्श प्रेम स्वीकारुन एक नैतिक जीवन जगता येते याचे भान जर ठेवले तर लाखो लो आपल्यावर प्रेम करतील. प्रेमाच्या नावाखाली निरर्थक पैसा उडविणारे, वेळ गमावून मनोरंजन करणारे, सायंकाळी चौपाटीवर धिंगाणा घालणारे खूप उदाहरणे आहेत. परंतु प्रेम केल्यानंतर स्वत:च्या पायावर उभे राहण्यासाठी भविष्य घडविण्यासाठी एक आदर्श जीवन जगण्यासाठी साथ सहयोग देणारे युवक युवती फार दूर्मीळ असतील म्हणून तर आज प्रेम मजबूत नाही. प्रेमामध्ये साधारणपणे होते काय तर घरचा पैसा असतो तो पर्यंत उडावयचा, कमावण्याचे वय होते तरी पैसा कमविण्याची क्षमता स्वत:मध्ये येत नाही. जोडपे लग्न करतात तर काही पायावर उभा असलेला साथीदार पाहतो. काही थोडे लग्न करतात. प्रेम विवाह म्हणल्यावर घरचे लोक मदत करत नाहीत. कमाई नसते उपासमारीची वेळ येते आणि मग सुरु होतो एकमेकांना दोषारोपण करायला लग्नाअगोदर एवढे पैसे उधळले तेवढे पैसे उधळले पण तेव्हा त्याचा काहीच

फायदा नसतो. प्रेमाच्या नावाखाली लग्नाअगोदर जो निरर्थक पैसा उधळला जातो त्याचा जर चांगला वापर केला असता, पुस्तक आणून वाचले असते तर किमान चांगले शिकून नोकरी करता आली असती. नोकरीची क्षमता आपल्याला नसती तर रोज शंभर दोनशे रुपये चार पाच वर्षेखर्च करण्याऐवजी चौपाटीवर जाऊन एक गुण त्या लोकांकडून शिकला असता व चहा नाश्ताची टपरी सुरु केली असती व दोघांनी एकमेकांना साथ दिली असती तर दोघेही स्वत:च्या पायावर उभे राहिले असते. छातीठोकपणे सांगितले असते. आज मला रोजगार आहे तो माझ्या प्रेमामुळे आहे परंतु समजातील परिस्थिती आज उलटी आहे. युवकांचा खिशा रिकामा आहे आणि मित्रच त्याला बोलतात लफडे केले म्हणून हे दिवस आले. प्रेमाला लफडे म्हणणारे आपलेच मित्र आपल्याच समोर प्रेमाची टिंगल करतात व आपण निमुटपणे सहन करतो याचा अर्थ आपण प्रेम योग्य प्रकारे करत नाही किंवा जे करतो ते प्रेम नसते.

युवक व युवतींनी ठरवले माझ्या जोडीदाराला स्वत: पायावर उभे राहण्यासाठी आम्ही प्रयत्न करु व प्रेमात एकमेकांना घडविण्यासाठी पाऊल उचलले असते तर आईवडिलांनी स्वत: म्हटले असते बाळ प्रेम कर व स्वत: पायावर उभा किंवा उभी रहा परंतु आज आईवडील म्हणतात बाळ प्रेमात पडून स्वत:च्या पायावर दगड पाडून घेऊ नकोस. कारण प्रेमात आजपर्यंत कोणी मोठे झाले याचे उदाहरण त्यांच्याकडे नाही, उलट प्रेमाच्या नावाखाली रिकामी कामे करुन जीवन उद्ध्वस्त झालेल्या लोकांची यादीच त्यांच्याकडे आहे. आज या दिवशी तरी युवकांनी प्रेम माणसाला दूर्बल नाही तर युवकांनी प्रेम माणसाला सक्षम बनवते हे मनोमन ठरवून प्रेमाची प्रतिमा स्वच्छ करण्याचा प्रयत्न केला तर प्रेमाचा विजय होऊ शकतो.

*****

## आई-वडिल आले माझ्या वाट्याला

बंगला गाडी गेली वाटनित मोठ्याला
घराजवळची बाग मिळाली धाकट्याला
सुपीक शेतीची जागा दिली छोट्याला
किती माझे भाग्य आई वडील आले
माझ्या वाट्याला ।। धृ.।।

पंच जमले होते आम्ही वाटणी करताना
आगीत तेल घालत होते आम्ही भांडताना
आम्ही उत्सूक होतो हिस्सा मागताना
त्यांना आनंद होत होता घर विभंगलेला दिसतांना
सगळ्यात धन संपत्ती हवी होती मोठ्याला
किती माझे भाग्य आई वडील आले
माझ्या वाट्याला

संपत्ती नावावर करण्याची
प्रत्येकाला झाली होती घाई
आम्हाला कोण साभांळेल
या आशेने बघत होते बाबा आई
आई-बाबा माझ्याकडे चला म्हणायला
पुढे कोणीच सरकला नाही
मला कळतच नव्हते माझ्या वाट्याला येईल काही
दाग दागिने आईचे दिले पंचांनी धाकट्याला
आई-वडिल आले माझ्या वाट्याला

सगळे खुश झाले बनुन करोडपती
फक्त आई-वडिल हीच माझी मोठी संपत्ती
आई-वडिलांच्या आशीर्वादाने मला मिळाली
सुख शांती शेवटी आई वडिलाचा आशीर्वाद येईल
कामी अंती किती नशीबवाण मी काहीच कमी नाही
माझ्या साथेला किती माझे भाग्य
आई-वडिल आले माझ्या वाट्याला.

**निखिल काकडे**
बी.ए. भाग २

# आठवणींची पिसे



**कु. भाग्यश्री ठवकर**
बी.ए. भाग ३

आयुष्य निरंतर प्रवाहाप्रमाणे असतं. ते न थांबत वाहात राहतं पुढे पुढे. बरेच पुढे गेल्यावर आपण वळून बघतो मागे, थबकतो पुन्हा चालाचला लागतो.

प्राजक्ताची नाजूक फुलं परकराच्या ओट्यात वेचण्याचं हळवं वय कधीचच मागे पडून गेलेलं. आनंद, उल्हास, स्वप्न, ध्यास सहजपणे पेलता येण्याचे कोवळे दिवस सोडून गेलेले. आयुष्याच्या माथ्यावर उभं राहून मागे वळून पाहण्याचा अनुभव किती हवाहवासा असतो. तनामनावर पोक्तपणाच्या खुणा उमटलेल्या. कडू-गोड वाट्याला आलेलं खूप काही पचवून झालेलं. काळाने अनुभवाचं छोटं-मोठं भांडार ओटीत घातलेलं. या अशा विस्तारलेल्या क्षितिज रेषेवरुन मागे वळून बघायचं पुन्हा पुन्हा अशी मागे वळून बघण्याची प्रत्येकाची सवय जुनीच. गतस्मृतींचे वैभवी धन आपल्या उदास, दुखण्या, फिरफिरणाऱ्या मनावर स्वप्नांची एक गर्द झुळूक पसरवीत जाते. एकटेपणाच्या कावर, व्याकूळ जाणीवेतून सुटका होते काही क्षण तरी 'प्राप्तकाळ हा विशाल भूधर सुंदर लेणी तयात खोदा' केशवसुतांच्या या काव्यपंक्तीप्रमाणे वर्तमानाचं बोट धरुन चालायचं ठरवलं तरी भूतकाळ वगळता येत नाही. भुतकाळाने प्रत्येकाच्याय जगण्यावर ओझं लादलेलं नसलं तरी त्याने आपल्या झोळीत टाकलेलं रम्य आठवणीचं दान आपल्या वर्तमानाला उभे करण्यात हातभार लावत नसतं काय ? वर्तमानाला जपणंही महत्त्वाचं. वर्तमानाला जपता आलं की सुंदर भविष्यासाठी ताटकळत बसायची गरजच उरत नाही. आठवणी माणसाच्या सुखः दुःखाची कमान तोलून धरतात नि त्याला जोडून देतात तिनही काळाशी. आपण बांधलेले आशा अपेक्षांचे इमले वर्तमानात कोसळू लागले, तरी स्मरणांच्या दारात बांधलेले तोरण फडफडत राहते. पावलापावलांवर दिवस येतात. नि भुरकन् उडून जातात. फुलपाखरांप्रमाणे. मागे ठेवून जातात आठवणींची काही पिसे. पांढरी, काळी, पिवळी, निळी, सोनेरी, रुपेरी नि बोटांवर सुख-दुःखाचे रंग. सोबतच त्या रंगांना चिकटून असलेले अविस्मरणीय संदर्भ. स्पर्शाचे ठसे गोंदलेल्या तळहाताना, भावनांच्या चिंब ओल्या सरींना, पापण्यांवरच्या थेंबांना, स्नेहगंधीत क्षणांना आठवत जातो पुन्हा पुन्हा काही आठवणींचे जपून ठेवतो आपण देखणे व्रण उठू देत नाही. जगण्यावर एकही साधा ओरखडा उमटाव्यात कुणाच्यातरी जखमा आपल्याच जगण्यावर म्हणून उदार. निःस्वार्थ झालो असतो आपण कधी ! कधी अलिप्ततेतूनही आपल्या झोळीत पडलेले स्नेहप्रितीचे चार-दोन क्षण जपून राखत झालो असतो आपण निःस्वार्थ फकीर.

''असतात काही आठवणी
प्राजक्त फुलांसारख्या ! वाऱ्याच्या
एका मंदशार झुळूकीतही टपटपावा
अलवार सडा तशा अचवित येतात
संदर्भासह, वर्तमानावर पांघरुन
झिरझिरीत पडदा दरवळत राहतात
सभोवती काही क्षण. कधी कधी
सूर्योकिरणातून उतरुन येतात
अंगणात आठवणींची फुलं नि उदास
मनाला दावतात प्रकाशाचे कवडसे.''

*****

## भूतकाळात डोकावल्या शिवाय

भूतकाळात डोकावल्या शिवाय
मजा काही मिळत नाही
मागे वळून पाहिल्यावर
हसावं का रडावं कळतं नाही
साऱ्याच गोष्टीमध्ये
खूप खूप बदल झाले
पहिल्या पेक्षा प्रत्येकाला
नक्कीच बरे दिवस आले
खरं वाटणार नाही पण
एवढं सगळं बदललं
निगरगट्ट माणूस सुध्दा
मुळासकट हादरलं
शाळेतून घरी गेल्या गेल्या
दप्तर कोनड्यात जायचं
दुसऱ्या दिवशी शाळेत जाताना
बाहेर काढलं जायचं
अहो दप्तर म्हणजे काय
वावराची पिशवी असायची
जून्या फाटक्या पुस्तक सोबत
फुटकी पाटी दिसायची
अभ्यास कर म्हणून कुणी
म्हणलंही नाही आणि मार्क कमी पडले
म्हणून हाणलंही नाही.

**कु. दिव्या घोडे**
बी.ए. भाग २

## श्रावणातला पाऊस

रंग रंगात रंगला श्रावण
नभं नभात उतरला श्रावण
पानं पानात लपला श्रावण
फुलं फुलात उमलला श्रावण
गंधं गंधात दरवळला श्रावण
स्वरं स्वरात गुणगुणला श्रावण
श्वासं श्वासात गुंतला श्रावण
गीतं गीतात गुंफला श्रावण
प्रीतं प्रीतीत हरवला श्रावण
बंधं बंधात बांधला श्रावण

**कु. ऋतिका कापडे**
बी.ए. भाग २

## पावसाने दिलेली आठवण

मी एक थेंब
जीवनाच्या पावसा बरोबर येणारा
आयुष्याच्या पानावर विसावणारा
काही क्षण विसावून ओघळून जाणारा
दुसऱ्या थेबांशी एकरुप होणारा
कोवळ्या उन्हात
मोत्यासारखा चमचमणारा
क्षणभराच्या अस्तित्वानेही
दुसऱ्यांना आनंद देणारा
अन् जाता जाता अनेक क्षणांची
आठवण ठेवून जाणारा

**कु. कल्याणी काळकर**
बी.ए. भाग १

# मरणासाठी कोणाचाच आदर्श नसावा

**कु. राजश्री वाकपैंजण**
बी.ए. भाग ३

जन्मासाठी कोणाचा आदर्श नसतो. मरणासाठीही तो नसावा. व्यक्ती तेवढ्या प्रकृती, अभ्यास तेवढ्या आवश्यकता, झाड फुलण्याची तऱ्हा, तसा त्याचा शेंडा, ज्योत दर क्षणाला, आपापला स्वत:चा निराळा आदर्श शोधणारी.

अर्थात चतुर माणसांना एवढ्या आर्जवाने सांगण्याची फारशी जरुरी नसते. ज्याच्या बद्दल आदर आहे, असे एकमेव जीवन निवडायला सांगितले तर महाराष्ट्रातील बहुसंख्या माणसे, ज्ञानेश्वरांची मृत्यूश्रेष्ठता मानतील.

पण त्याचा देहत्याग करण्याची तऱ्हा पत्करायला कोण जाते आहे? अर्थात जायला नको सुध्दा, न जाणेच बरोबर आहे, तेच प्रस्तुत आहे वर ज्ञानेश्वर महाराजांचे उदाहरण दिले आहे ते फारच निराळे आहे. उंच आहेच. ज्याच्याबद्दल आदर वाटतो ते आपण करु शकलो असतो, तर त्याच्याबद्दल आदर वाटण्याचे फार निराळे कारण उरले नसते. साधारणत: आपण जे करु शकणार नाही, ते मुळात एखादा माणूस करु शकला, तर आपल्याला त्याच्याबद्दल आदर वाटतो. आपण गणितात शंभर गुण मिळवू शकलो पण शंभर गुण मिळणाऱ्या दुसऱ्याबद्दल फारसा 'आदर' वाटण्याचे कारण उरत नाही. त्यांनी आपल्याला शिकवले असेल, तर कृतज्ञता वाटते, आणि वाटायला पाहिजे. तेवढ्यापुरती आदराची भावना असेल, एरवी शंभर गुण मिळवणाऱ्या प्रत्येकाला 'आदर' दाखवण्याचे कारण उरत नाही.

ज्ञानेश्वरांचेच उदाहरण पुढे चालवून आणखी विश्लेषण करता येईल. ज्ञानेश्वरांनी समाधी घेतली तशी त्याच्या तीन भावंडांनीही घेतली. प्रत्येकाने निरनिराळ्या ठिकाणी घेतली आणि निरनिराळ्या काळात घेतली. तशीच ती निरनिराळ्या पातळीवर घेतली. त्यांची समाधी दु:खाने, वैतागाने, नाईलाजाने अशी नव्हती. पण ज्ञानेश्वर समाधिस्त झाल्यावर काहीशा आशाशून्य अशा अवस्थेत, ज्ञानेश्वरांच्या समाधीनंतर त्यांनी जीवनमुक्ती जवळ केली.

प्रत्येकाने आपला जीवितहेतू जपायचा असतो. व्यक्तिविशिष्ट पातळीवर नक्कल उपयोगी पडत नाही, अक्कल उपयोगी पडते. सैन्यात धारातिर्थी पडणारा वीर, देशासाठी फासावर जाणारा हुतात्मा, ही आदर्श उदाहरणे आहेत. परंतु त्यांचे धैर्य अभ्यासपूर्वक तुम्ही समजून घेता, तसेच त्याची फाशी अनुकरणात्मक लक्षात घेण्यात अर्थ नाही.

प्रत्येक फुलाचे फळ होते. ते यथाकाल गळून पडते. त्याचा आदर दाखवण्यासाठी, कळीने अवेळी गळून जाण्यात काहीच अर्थ नसतो.

*****



## पाऊस आला

रिपरिप येतो मनी तरंगतो आनंदाचे गाणे
रंग येऊन पानोपानी स्मरवितो तराणे
पाऊस आला, पाऊस आला, पाऊस आला
बालपणाच्या आठवणी घेऊन तो येतो
पाण्यातल्या होड्या नि गाणी तो गातो
वारा पण अलगद डोल लागतो.
हिरवा निसर्ग सारा ओलागार होतो.
पाऊस आला, पाऊस आला, पाऊस आला
मित्र तो सखा तो हळुवार येतो
मन प्रसन्न करुन तो आनंद देतो
गरम चहाचा स्वाद तो वेगळाच देतो
हाताच्या बोटावर तो आपला नादच करतो
पाऊस आला, पाऊस आला, पाऊस आला.

**कु. पुजा धनसुईकर**
बी.ए. भाग १

## शोध माणसाचा !

जगात माणसांच्या
माणूस शोधतो मी
रांगेत दर्शनाच्या
भाविक शोधतो मी
झोपडीत गरीबांच्या
सर्वस्वी भूक होती
कुपोषणाच्या जगतात
अन्न, अन्न शोधतो मी
इमारतीत श्रीमंताच्या
होते सर्व काही
गर्विष्ठांच्या दुनियेत आपुलकी शोधतो मी

**कु. प्रियंका गायकवाड**
बी.ए. भाग १

## शेतकऱ्याची हाक

काहून रे निसर्गा
असा काहून करतं
शेतकऱ्याले आमच्या
उपाशी मारतं
काहून निसर्गा तुवा
पाणी ठेवलं थांबून
शेतकऱ्यांची पेरणी
गेली औंदा लांबून
शेतकरी पावसाची
पाहत होते वाट
निसर्गाने दिली
औंदा शेतकऱ्याला चाट
रोज आमचा शेतकरी
पाहत होता वाट तरी
आली नाही निसर्गा
तुला शेतकऱ्याची कदर
खर्चाने शेतकरी गेला
सारा तुटून रोज झोपेतून पाये,
पाण्याला उठून पावसाची वाट
पाहू पाहू शेतकरी गेला थकून
शेवटी निसर्गा
शेतकऱ्याचे पिक गेले सोकून
निसर्गाने औंदा शेतकऱ्याले मारुन टाकलं जितं
पाहू नको निसर्गा आमच्या शेतकऱ्याचे चित्तं
थोडी नाही आली तुजले शेतकऱ्याची जान
लय मोठी केली औंदा तुवा
शेतकऱ्यांची हान

**कु. प्रांजली ठाकरे**
बी.ए. भाग १

# मी 'नसेन' तेव्हाच सामर्थ्यवान असेन



**सद्दाम शाहा**
बी.ए. भाग ३

'नसण्या' बद्दलचे नकाश्रू किंवा अश्रू दोन्ही अनावश्यक असतात. कारण 'नसणे' हेच सामर्थ्यवान असते. जेव्हा 'असणे' हे ज्ञानाधिष्ठित असते, तेव्हा कोणी म्हणतात, एवढे मोठे महात्मा गांधी त्यांना राष्ट्रपिता म्हणतात. सेवाग्रामला त्यांच्या राहात्या झोपड्यासुध्दा नेटक्या, आदराने फुललेल्या दिसत नाहीत. सत्य, अहिंसा कोणी पाळत नाही. खादी ही खाण्याच्या अर्थाने भरभराटीला आली. गांधीवाद उरला तो फक्त 'वाद' घालण्यापुरता. त्यांचे परमशिष्य विनोबा त्याच्या 'गागोदे' या जन्मगावी स्थिती कितीशी उरली आहे ? मूठभर स्त्रिया या मुख्यत: तेथे उरल्या आहेत. हिंदुस्थान पायाखाली घालत जग छोटे करणारा तो महात्मा, आता पवनारला तरी कुठे उरला आहे ?

हे सगळे बोलणे अनाठायी. मुळात ज्ञानीपणाची व्याख्याच वरवरची केली, की सुरुवातीलाच सगळे संपून जाते. मग मुळात 'असणे' हेच नसणे होते. महात्मा गांधी हे कर्मयोगी होते. भले अनासक्त कर्मयोगी होते.

ज्ञानयोगी होते ते भगवान बुध्द, महावीर, महंम्मद, ख्रिस्त, मोझेस, गीता, मृत्यूबद्दल निर्भय घेण्यास सांगते. 'रणांगणात लढताना मेलास, तर स्वर्गात जाशील; जिंकलास तर येथेच पृथ्वीवर सुख भोगशील' सही सही हाच निर्णय, कुराणात दिसेल. पण याचा अर्थ असा नव्हे की, महंमदानी गीता वाचून संदेश दिला. त्यांचे ज्ञान वेगळे होते. परशक्तीशी झालेला संवाद स्वतंत्र होता. ज्ञान याचा अर्थ वर वर करुन चालणार नाही. प्रयत्नाची पावले कुठल्याही ध्येयाचे पैलतीर गाठण्याची धडपड करत असताना, अशावेळी परास्पर्शाचा जो संवाद घडतो, त्या प्रक्रियेत खरे ज्ञान होते.

स्वत:चे देहभान विसरुन, अज्ञाताच्या ज्ञानामध्ये जेव्हा माणसे जळत जातात, जे स्पष्ट दिसत नसते ते शोधून काढतात, नसल्याचे असते करतात, तेच स्वत: 'नसल्या'वरही असू शकतात.

माणसाला खरे पटावेच लागते. तो कशासाठी किंवा कसा 'असत' राहायला यावरुन त्याच्या नसल्यातले खरे-खोटे कळते. जी माणसे जगताना जगण्याचाच विचार करतात, ते जगण्याबाहेर गेल्यावरही जगण्याचा विचार करतात. 'अस्त' हा शब्द 'नसणे' सुचवतो. पण त्या शब्दाचे शेपूट जोडाक्षरातून सोडवले तर तो 'असतं' होऊ जातो. तेच नसल्यातलं 'असतं' नसते का ? नकारातला स्वीकार जर समजला नाही, तर आपल्याला स्वीकाराचा खरा अर्थ समजणार नाही.

*****

## माझी कविता

अंतरीचे भाव माझे
मी कागदावर उतरवतो
शब्द शब्द जुळवून
माझी कविता तयार करतो
कोणी ऐकू नाही ऐकू
मी प्रत्येकाला ऐकवतो
छान छान आहे कविता
म्हणता ना धन्यवाद !
मी त्यांना देतो
कधी धरती कधी आकाश
कधी निसर्ग कधी विरह
माझ्या मदतीला धावतात
शब्द शब्द घेऊन कवितेत
अडकतात नसेल गोड पण नाही
कडू चव माझ्या कवितेची
गोड मानून घ्या जन हो
कविता माझ्या अंतरीची

**कु. प्रगती बनसोड**
बी.ए. भाग १



## बाजार

फिरता फिरता बाजारातील
पुन्हा उपाशी माप भेटले
जगण्यासाठी अमृत होते
तिथे विषारी साप भेटले
शिकलो आम्ही शास्त्र अर्थाचे
सुत्रे होती पाठ परंतु
न पिकताही भाव घसरले
कौटील्याचे बाप भेटले
निवचीत झुलनाऱ्या फळबागांची
निकषामध्ये फळे अडकली
या मेलेल्या बाजारातून
फसवे वार्तालाप भेटले
आज पुन्हा या कातरवेळी
आयुष्याच्या संध्याकाळी
सुर्यालाही दान तमाचे
सरता आपोआप भेटले
मातीवरचे दळभद्री गाणे
आकाशाच्या श्रुती ऐकती
आभाळाच्या वाकोल्यांचे
या मातीला शाप भेटले
तुझी उपाशी पोटे भरण्या
मी भाकर पेराया जन्मलो
लोक म्हणती पुण्यवान तू
तरी नशीबी पाप भेटले

**सौरभ बैस**
बी.ए. भाग १

# यशाचा डी.एन.ए.



**विपीन कोठार**
बी.ए. भाग ३

एका जत्रेत एक फुगेवाला फुगे विकत होता. छान रंगीत गॅसचे फुगे. अर्थातच बालगोपालांना आकर्षित करण्यासाठी तो काही फुगे हवेत उडवत होता. खूप मुलांचा घोळका त्याच्या भोवती जमा झाला होता. त्याची विक्री भराभर होत होती. फुगे विकण्यात व्यस्त असलेल्या फुगेवाल्याला अचानक आपला सदरा कोणीतरी ओढत आहे असं लक्षात आलं. पाहतो तर काय एक लहान मुलगा त्याचा सदरा ओढत होता. त्या लहान मुलाने एक प्रश्न फुगेवाल्याला विचारला. हे सगळे छान रंगीबेरंगी फुले आहेत म्हणून ते हवेत उडत आहेत का? आणि माझ्याकडे समजा काळ्या रंगाचा फुगा असेल तर तो उडणार नाही का? फुगेवाल्याने सांगितलं, ''अरे हे रंगीबेरंगी फुगे आहेत म्हणून ते उडत नाहीत, तर त्यांच्या आत जे भरले आहे त्यामुळे ते फुगे हवेत किती उंच उडायचे हे ठरतं.''

आपलं आयुष्य देखील त्या फुगेवाल्याकडल्या फुग्यांसारखच आहे नाही का? आपण बाहेरुन कसे दिसतो आहोत त्यापेक्षा आपल्या आत काय भरलंय, आपल्या वृत्ती कशा आहेत. आपली विचारसरणी कशी आहे, आपलं आंतरिक व्यक्तिमत्व कसं आहे यावर आपण किती उंच भरारी घेणार आहोत आणि यशस्वी होणार आहोत हे ठरतं. ''मी कधीच यशस्वी होऊ शकत नाही हो'' ! ''खूप प्रयत्न करुन सुध्दा मला सतत उच्चारत असतात'', ''यश मिळवण्याचा काही फॉर्म्युला आहे का? काही मंत्र आहे का?'' असाही प्रश्न विचारत असतात. यशस्वी आणि संपन्न आयुष्याच्या प्राप्तीसाठी काही वृत्तीचा आवर्जून जोपासना करायला पाहिजे. मुद्दामहून 'जोपासना' हा शब्द वापरला आहे. कारण यशस्वी आयुष्यासाठी लागणाऱ्या वृत्ती, सवयी, कौशल्य आपल्यात असतातच असं नाही. त्या रुजवाव्या लागतात, जोपासाव्या लागतात. यशाचा डी.एन.ए. निर्माण करावा लागतो.

मोठे स्वप्न बघायला आपण शिकलं पाहिजे. जेवढे मोठे स्वप्न तेवढे ते साकार करण्याची ताकदही त्या स्वप्नातच असते. मोठा भव्य दिव्य विचार करणारे आपण असायला हवे. कल्पना चावला ही लहान असतांनाच वडिलांना प्रश्न विचारायची की ''या आकाशात चांदण्या दिसत आहेत त्या कशा टांगल्या आहेत ? त्या किती उंच आहेत ? तिथपर्यंत जाता येईल का? मला तिथपर्यंत पोहोचायचं आहे !'' वयाच्या चौथ्या पाचव्या वर्षी विचारलेल्या प्रश्नात ती अंतराळवीर होण्याची बीज आपल्याला दिसतात. शिवाजी महाराजांनी पाहिलेल्या हिंदवी स्वराज्य स्वप्नातून राज्य निर्माण झालं. डॉक्टर ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचे सुंदर वाक्य आहे. 'झोपल्यानंतर पडतात ती स्वप्न नव्हे; तर जे बघितल्यानंतर झोप उघडते ते म्हणजे स्वप्न !' अशी स्वप्न बघण्याची दृष्टी असायला हवी.

'तुका म्हणे बळ निश्चियाचे फळ' निश्चियाचे बळ मिळतं. आपल्या जीवनात सवयीमध्ये, आयुष्यात, परिस्थितीमध्ये जर आपल्याला बदल हवा असेल तर निश्चय करायला पाहिजे. निश्चय बरोबर; आणि बदल बरोबर निश्चय हे समीकरण चमत्कारासारखे परिणाम घडवते.

*****

## आई

जगात येतांना त्रास देऊन येतो आपण
झालेल्या वेदना ती लेकरासाठी सोसते ती आई
फुलपाखराला उडायला शिकवते ती आई
उपाशी राहून प्रेमाचा घास भरवते ती आई
बाळ झोपत नाही म्हणून अंगाई गात जगते
ती आई, आपल्या जखमा पाहून डोळ्यात
पाणी आणते ती आई, माझी आई खूप
चांगली आहे खरच भाग्यवान आहे मी
मला दिलीस आई

**कु. प्रगती मानकर**
बी.ए. भाग २

## माझी माय

माय आता कुशीची माती जरा मला दे
रक्तास पोसणारी नाती तरी मला दे
विव्हाळल्या दगडास मोठी उसंत दे गं
आपट नको मला तू थोडे तरी जगू दे
आई तुझ्याच उदरी येईल मी सदा ग
पण पोटात पूर्ण मजला यथार्थ वाढू दे
मुलगी म्हणून तुझी आली तरी मी येथे
होऊन काठी हाताची आता मला फिरु दे
कित्येकदा पाजला तू काढा नको नकोसा
पोटास दाबणाऱ्या काकूस तू सजा दे
आई आता कुशीची माती जरा मला दे

**कु. काजल मनोहर**
बी.ए. भाग १

## सुंदर जीवन

जन्मला आलो खरा या जगामध्ये
उगीवच भासते या दुनियेमध्ये
कुणाच्या तरी मायाजवळ प्रेमाची
सर्वा जगामध्ये कुठे नाही मिळायची
ममतेचा हात धरुनी चालायला शिकलो
अर्ध्या वाटेवर सोडल्यावर जगायला शिकलो
एका जीवाने दोघाचे प्रेम दिले
त्यांनीच जीवन जगविण्यास लाजविले
दोघांमध्ये कमवूनी लाखाची संपत्ती
भिकारी मयापुढे ममतेच्या तत्पुरती
लाखोपती धनपती करोडपती म्हणावे
भिकारी असून सुध्दा ममता त्याला मिळावे
या जीवनात ओरडून सांगतो सर्वाजना ममते विना
सर्व जीवन आहे सुना सुना

**कु. मनीषा तायडे**
बी.ए. भाग १



# श्रीमद्‌भगवद्‌गीता



**कु. निकिता घाटे**
बी.ए. भाग ३

असे म्हणतात, अनेक हजार योनींतून जन्म घेतल्यानंतर मनुष्याचा जन्म होतो ..... त्यामुळे या मनुष्य जन्माचे सार्थक होण्यासाठी मनुष्य जीवनाचा अर्थ समजण्यासाठी, मानवाने प्रयत्नशील राहणे गरजेचे आहे. जन्माचे सार्थक म्हणजे नक्की काय? जीवनाचा नक्की उद्देश काय? असे प्रश्न आपण सर्वांना कधीना कधी नक्की पडले असतील.

निसर्गात असलेल्या सर्व प्राणीमात्रांत ''बुध्दि'' ही फक्त मनुष्याला आहे. म्हणूनच हजारो वर्षां जो मनुष्य अश्मयुगात राहत होता तेव्हापासून मनुष्याची उत्क्रांती झाली व आजही होत आहे, ते केवळ मनुष्य जन्मास लाभलेल्या बुध्दीमुळेच ... इतर प्राणी मात्र हजारो वर्षापूर्वी जसे होते, तसेच आजही आहेत. त्यामुळेच आपण असे म्हणतो की, हया जन्माला सार्थक कसे बनवावे? हा प्रश्न खरंच महत्त्वाचा आहे. हा जन्म सार्थक कसा करावा? कारण हा जन्म वाया गेल्यास पुन्हा मनुष्य मिळण्यासाठी पुन्हा काही हजार योनींमधून जावे लागेल ! आजच्या आधुनिक जीवनात येणाऱ्या प्रसंगांना कसे तोंड दयावे ? जीवनात कर्माचे महत्त्व किती आहे? या व अशा हजारो प्रश्नांची उत्तरे आपणास हवी असल्यास ती उत्तरे ''श्रीमद्‌भगवदगीता'' हेच एक उत्तर आहे. महाराष्ट्राचे थोर आत्मसाक्षात्कारी संत श्री ज्ञानेश्वर महाराज यांनी देखील याच भगवदगीतेवर आधारीत सर्व सामान्यांना समजेल असा ''ज्ञानेश्वरी'' हा अद्‌भूत ग्रंथ लिहीला.

भगवान श्रीकृष्णाने रणभूमीवर निष्क्रिय, निराश व हताश झालेल्या अर्जुनाला या भगवद्‌गीतेच्या माध्यमातून उपदेश दिला. या गीतेमध्ये जीवनाचा सखोल विचार केलेला आहे. विशेष म्हणजे ही भगवद्‌गीता हा ग्रंथ मनुष्य जीवनाचे गोड रहस्य उलगडून त्याचे जीवनास दिशा, प्रेरणा, मार्गदर्शन देणारा ग्रंथ आहे.

भगवद्‌गीता आरशाप्रमाणे आपल्याला स्वरुपाचे दर्शन देणारा ग्रंथ आहे. ज्याप्रमाणे आपला चेहरा आपल्याजवळ असूनही स्वतःचा असूनही आपण तो कशाचा तरी आधार घेतल्याशिवाय त्याचे प्रतिबिंब पाहू शकत नाही. त्याचप्रमाणे आपल्या जीवनाचे परिपूर्ण दर्शन होण्यासाठी जो आधार हवा आहे, तो आधार म्हणजेच ''भगवद्‌गीता'' होय.

आज अनेक लोक दुःखाने होरपळलेले आहेत, ते चिंताग्रस्त आहेत अशा सर्वांनी या ग्रंथाचा आधार घेऊन, तिला शरण जाणे, तिला आत्मसात करणे गरजेचे आहे. हा ग्रंथ संपूर्ण मानवजातीला उपदेश करीत असल्याने विश्वव्यापक आहे. आपण सर्वांनी यामध्ये दिलेला उपदेश समजून घ्यावा व त्यामुळे आपल्या जीवनातील सर्व दुःख नैराश्य नक्की नाहीसे होतील.

माझ्या मते प्रत्येक व्यक्तीने हा ग्रंथ वाचून त्यावर आत्मसात करणे हे गरजेचे आहे.

*****

## नातं मैत्रीचं

तुझी माझी मैत्री
नाही जुळता जुळली
मात्र तुझी प्रीत
मला नाही कळली
मी घट्ट करीत होते
मैत्रीच्या बंधनाला
तू शोधीस होतास
मैत्रीमध्ये जीवन साथीला
मी फुलवित होते
कळ्यामधून मैत्रीची फुले
तू मैत्रीच्या कळ्यामधून
फुलविली प्रेमाची फुले
कळतच नाही मला
असे कोणते क्षण
ज्यामध्ये गुंतले तुझे
माझ्या मध्ये मन
करुन मैत्री
दुःख देण्याचे स्वप्न ही नव्हते
कारण मैत्रीमध्ये दुःख
सावरण्याची कला असते
म्हणूनच समजून घे
मैत्री म्हणजे प्रेमचं नसतं
नातं मैत्रीच
त्यापेक्षा मोठं असतं.

**कु. माधुरी पचारे**
बी.ए. भाग १

## जीवन

जीवन हे
विद्यार्थ्यांच्या वहीतीलं पान असतं
रिकाम तर रिकामं
लिहलं तर छान असतं
शेवटचं पान
मृत्यू अन पहिलं पान जन्म असतं
मधलं पानं आपणच भरायचं असतं
कारण ते आपलचं कर्म असतं
होणाऱ्या चुकांना टाळायचं नसतं
कुठलंच पान कधी गाळायच नसतं
चुक झाली तरी फाडून फेकायचं नसतं
कारण त्यातूनच
आपल्याला पुढे शिकायचं असतं
नाती जपण्यात मज्या आहे
नशीब आपल्याच हाती असतं
येताना काही आणायच नसतं
जाताना काही न्यायचं नसतं
मग हे जीवन तरी कोणासाठी जगायचं असतं
याच प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी
जन्माला यायचं असतं
आहात तुम्ही 'समजावयला' म्हणून रडायला
आवडतं, आहात तुम्ही सावरायला म्हणून
चुकायला आवडतं
माझ्या जीवनात आहेत तुमच्या सारखे सगळे
म्हणून मला जगायला आवडतं, जगायला आवडतं

**कु. प्रतीक्षा इंगळे**
बी.ए. भाग १

# एकाग्रता साधना

**कु. आरती ठाकरे**
बी.ए. भाग ३

एकाग्रता ही मानवी जीवनातील अत्यंत आवश्यक गोष्ट आहे. जीवनातील प्रत्येक पावलावर या संकल्पनेची आवश्यकता भासते. वाचन, अभ्यास, लेखन अशा गोष्टींसाठी जशी एकाग्रतेची आवश्यकता आहे, तसेच ऑपरेशन टेबलवर शस्त्रक्रिया करणाऱ्या डॉक्टरांना देखील त्याची आवश्यकता असते. रोजच्या प्रत्येक कामात, व्यवहारी जीवनापासून ते आध्यात्मिक जीवनापर्यंत सर्व पायऱ्यांवर त्याचे महत्त्व आहे. थोडक्यात, जिवंत प्राण्याची ती नैसर्गिक गरज आहे; आणि म्हणून निसर्गाने ती सर्वांना बहाल केलेली आहे. काही व्यक्ती ती गमावतात, तर काही प्रयत्न साध्यतेने अधिक ताकद मिळवत आयुष्याची उंची गाठतात. खरं म्हणाल तर अधिक काटेकोर एकाग्रता शक्ती मिळवणं ही एक साधना आहे. आणि ती अत्यंत कठीण आहे. म्हणूनच प्राप्त मर्यादेपलीकडे अधिकीची शक्ती मिळविण्याकडे सहसा कोणाचा कल नसतो. ज्यांनी कोणी या साधनेची आराधना केली त्यापैकी कथितच कोणाला ती साधली. मन हे मुळातच चंचल. अस्थिर राहाणे ही त्याची वृत्ती. प्रत्येक क्षणाला सुखप्राप्तीचा आराधना केल्यामुळेच ते चंचल बनलेलं आहे, हा मुद्दा लक्षात घ्या. मनाची ओढ सतत सुखाकडे असते; तर सुखप्राप्तीसाठी गतीत गेलेलं मन सरतेशेवटी अगतिक होत असतं. मनाच्या या आक्रस्ताळेपणामुळेच मानवी जीवनातल्या कौटुंबिक, व्यावहारिक, तसेच अन्य प्रांतात आकांत निर्माण होतात कोणी म्हणतं की मला चटकन निर्णय घेताच येत नाही तर कोणी म्हणतं मला नैराश्य आहे.

आयुष्यात काही विशेष गोष्ट प्राप्त करायची असेल तर प्रथम संकल्प करा. संकल्पाशिवाय कुठलीही कठीण गोष्ट साध्य होऊ शकत नाही. एकाग्रतेच्या कुठल्याही प्रयत्नांना एक तर मन साथ देत नाही, यश देत नाही, किंवा यश मिळालं तरी ते टिकत नाही. वैचारिक स्थिरतेचा आधार नसल्यामुळे ते चंचल बनतं म्हणूनच एकाग्रता शक्ती प्राप्त करण्यासाठी मनाचा संकल्प होणे गरजेचे आहे.

एकाग्रता शक्ती उच्चतम अवस्थेत नेण्यासाठी ध्यान हा एक उत्तम मार्ग आहे. सुरुवातीच्या काळात सहज एकाग्रतेसाठी कुठलेही सोयीस्कर, आवडीचे, सहज एकाग्रता साधणारे असे प्रतीक, साधन म्हणून निवडा. त्या प्रतिकावर एकाग्र होणे म्हणजेच ध्यान, त्यासाठी एक वेळ व जागा निश्चित करुन प्रतिकाच्या माध्यमातून एकाग्रता साधा.

*****



## जीवन

खरच जीवन काय असतं
सुख दु:खाच मिलन असतं
दु:खाशी लढायचं असतं
धैर्य मात्र सोडायचं नसतं

जीवन असतं एक प्रवास
पण सोबत नसतं कुणी त्यात
दु:खात नसते कुणाची साथ
सुखाच्या पुढे हजारो हात

त्या मतलबी विश्वास
कोणीच कुणाच नसतो
सहानुभूतीच्या नावाखाली
कोरडा भास असतो.

अपयश आलं तरी
जिद्द सोडायची नसते
निराशा मनात बाळगून
खिन्न व्हायचे नसते

अपयशामध्ये सतत
यश शोधत राहायचं असतं
जे अनुभवी येत असतं
त्याला जीवन म्हणायचं असतं

**अक्षय बनसोड**
बी.ए. भाग २

## मोबाईल

बाबा सोडा मोबाईल
थोडा वेळ बागेमध्ये
खेळू आपण चला

सोबत तुम्हाला नेहमी
मोबाईल लागतो केवळ
घरी आल्यावर तरी
घ्याना मला जवळ

रात्रभर मोबाईल
असतो तुमच्या उशाला
तरी सुध्दा दिवसभर
सोबत ठेवता कशाला

बाबा आज मोबाईल
ऑफीसमध्ये विसरा
माझ्या चेहरा होईल
आनंदाने हसरा

दिवसभर मोबाईल
तुम्ही हातात धरता
माझे बोट धरुन
सांगा कधी फिरता

पुढच्या जन्मी मला
मोबाईल व्हायचं आहे
कारण मला दिवसभर
बाबा सोबत राहायच आहे

**वैभव आवारे**
बी.ए. भाग २

# आई



**कु. रोशनी माहोरे**
बी.ए. भाग ३

'आई' या विषयावर काय लिहावं हे कळतच नाही. कारण आईवर लिहिण्यासारखे खूप आहे. आणि बऱ्याच जणांनी लिहिलेले आहे. आई म्हणजे माया, प्रेम, वात्सल्य हे सगळं एका आईमध्ये असतेच. आई जे निरपेक्ष प्रेम आपल्या मुलांवर करते तसं प्रेम कोणीच करु शकत नाही. आई ही आई असताना इतरही सगळ्या जबाबदाऱ्या निभावत असते. म्हणजे ती एक पत्नी, सून, आत्या, मामी, काकू इ. नातीही सांभाळीत असते. लहान मुलांचा पहिला गुरु म्हणजे आई. आई बोलायला शिकवते. बोट धरुन चालायला शिकवते. आईचं सगळ्यांच मन जाणते. पण तिच कोणीच जाणत नाही. तिला कोणी समजून घेत नाही. आई म्हणजे गुरु, मैत्रीण सगळं काही आईजवळ आपण आपल्या मनातल बोलू शकतो. आणि तीच ते समजून घेणारी असते. हे आपल्याला माहित असते. वेळप्रसंगी ती शब्दांचा मार देते तर कधी समजावून सांगते. जगातली कुठलीही आई असो ती आपल्या मुलांवर सारखच प्रेम करते. तिथे गरीब श्रीमंत असा भेदभाव नाही. आई म्हणजे मार्ग दाखविणारी, सुखदु:खात साथ देणारी. आईला आपल्या मुलांच्या मनात काय चालल आहे ते लगेच कळते. मुलं आईजवळ हट्ट करतात आणि ती आपल्या मुलांचे पोट भरले की तिथेच पोट भरल्याचे समाधान तिला मिळते.

नुकतेच बघीतलेलं उदाहरण म्हणजे दवाखान्यात काम करणारी बाई तिने आपल्या लग्न झालेल्या मुलीला दवाखान्यात कामाला लावले. मुलीला दोन मुलं आहेत. ती जी बाई आहे ती बाई म्हणजे कॅन्टीनमध्ये माझी मुलगी जे खाईल ते पैसे तिने दिले नाही तर मी देईन पण तिला नाश्ता देत जा आणि मुलगी म्हणजे माझी मुलगी केव्हाही कॅन्टीनमध्ये काही खाण्यासाठी आली तर तिला देत जा. मी पैसे देत जाईन. मी तिला खाऊ नाही घालणार तर कोण घालणार ? म्हणजे पिढ्यानपिढ्या ही माया, ममता, प्रेम कमी होत नाही. आपल्या मुलांना काय आवडते ते त्यांना मिळाले पाहिजे म्हणून धडपडणारी आई इथे दोन्ही पिढ्या आपल्या मुलांसाठी जीव तोडत आहे.

पण मुलं मोठी झाली, शिकली असता आपल्या कामाला लागली की ते आईच प्रेम विसरतात तरीही ती तितकचं प्रेम करत राहते. तो मोठा झाल्यावरही त्याला मुलबाळं झाली तरीही आईची आपल्या मुलांची काळजी संपत नाही किंवा प्रेमही कमी होत नाही. मात्र जशी ती मुलं मोठी होतात. स्वत:च्या कामाच्या व्यापात त्या मुलांना आईच प्रेम दिसत नाही की काळजी दिसत नाही. मुल अपंग असो की चांगले असो आई आपल्या मुलावर तितकच प्रेम करते. उलट अशा मुलांवर अधिकच प्रेक करते. अशा अपंग मुलांना खूप समजून घ्याव लागतं. अशा मुलांच्या आईची तारेवरची कसरत असते. कारण तिला त्याला पण सांभाळायच असतं आणि त्याच्याकडे पाहणाऱ्या नजरांना तोंड दयायचं असतं. अशा मुलांच्या आईला आपल्या काहीही म्हटलेलं चालत नाही. कारण तिच्या मुलासाठी त्या केविलवाण्या नजरा आणि दयेचं बोलणं तिला नको असतं आणि अशाच मुलांच्या आईला त्याचे फार कौतुक असतं. म्हणजे तो असा करतो, तसं करतो वगैरे त्यांच्या बोलण्यात नेहमी असतं. कारण खरतर तिची मुलं हेच तिच विश्व असतं. तसचं समजा लग्न झालं मुल झालं आणि त्यामुलांचे वडील अचानक गेले तर त्या लहान मुलांसाठी ती आई आपलं सगळ जीवन पणाला लावते. पण जर आई गेली तर वडील लगेच दुसरं लग्न करतात पण आई एकटी काबाडकष्ट करुन त्याला वाढवते, मोठं करते आणि एकटीच सहन करते. म्हणूनच म्हणतात आई जे आपल्या मुलासाठी करु शकते तितकं कोणीच करु शकत नाही. पण त्या आईची किंमत सगळ्यांना कळली पाहिजे म्हणून म्हणतात.

*****

## या मनाला

दोन दिवस आठवणीत
दोन दिवस वाट बघण्यात
गेले, आज हाती शून्य
जीवन सारे प्रतिक्षेत गेले

कसे स्वार्थी जन हे सारे
स्वार्थी मित्र माणसे सारी
अपेक्षा करण्यात जगून झाले

कसे समजवावे या मनाला
ज्यात कुणी कोरुन जावे
या मनाला विचारात या
सर्व उध्वस्त झाले

कुणास का असावे त्यांचे
दु:ख हात स्वत:चे जाळीत
बसलो सुखमय शेकोटी
शेजारी तुझ्या जीवन सर्व
पोळून तुझ्या

उंच उडा रे गगणी
घेवून सर्व सुखे सोबती
झेप पाखरासवे ती
बघण्यात डोळे येवून गेले

**विजय गायकवाड**
बी.ए. भाग २

## फक्त एकदा

फक्त एकदा तू येऊन जा
माझे हृदय काढून त्यात डोकावून जा
हनुमानाचा हृदयात रामाची मूर्ती दिसली
माझ्या हृदयात मी तुझीच मूर्ती जपली
एक वेळ मला आजमाऊन जा
नाही तुझा गावी माझा अंश
माझ्या अणुरेणुत तुझाच अंश
प्रत्येक रेणुअणुत मी तुलाच पाहतो
म्हणून मी क्षणो क्षणाने झुरतो.
एक वेळ प्रेमाणे विष देऊन जा
माझे हृदय फाडून त्यात डोकावून जा !

**कु. किर्ती देशमुख**
बी.ए. भाग २

## भार

फांदीलाच फुलांचे का झाले भार
फुलांमुळेच तर फांदीचे खुलते श्रृंगार
झाडांनाच पानांचे का झाले भार
पानामुळेच तर झाडे होती हिरवी गार
पृथ्वीलाच आकाशाचे का झाले भार
आकाशामुळेच तर पडते पृथ्वीवर धार
पिलानांच आईबाबाचे का झाले भार
आईबाबा मुळेच तर उंचावते जीवनमान

**कु. शिवानी पवार**
बी.ए. भाग २

# दानाचा महिमा



**अनिकेत कापडे**
बी.ए. भाग ३

'दान ही एक सत्प्रवृत्ती आहे. केवळ
पैशाचे दान करुनच नव्हे तर श्रम वेळ,
प्रोत्साहन, स्नेह, सहानुभूती यांची दानही श्रेष्ठ
दान घेऊ शकते स्वभावात औदार्य असेल
तर दानशीलता उत्स्फूर्तपणे वाढत जाईल.'

इतरांच्या दु:खात जे सहभागी होत नाहीत त्यांना स्वत:च्या संकटकाळातही कुणाकडून मदत मिळत नाही. उदार स्वभावाच्या लोकांचे नुकसान होताना दिसते, कारण इतरांना मदत करण्यात त्यांचा वेळ, बुध्दी व पैसा खर्च होत असतो. पण सूक्ष्म विचार केला तर परिस्थिती अगदी उलट असते. बीज जमिनीत गाडून घेते पण त्यातूनच अंकुर फुटून रोपटे बनते. कालांतराने त्याचे डौलदार वृक्षात रुपांतर होते. त्या वृक्षाच्या छायेच्या फळाफुलांचा सर्वांना उपयोग होतो. बीजाने जे गमावले त्याच्या कित्येक अधिक पटीने त्यातून निर्माण झालेल्या वृक्षाने कमावले तेव्हा उदार स्वभावाचे लोक मुर्ख न ठरता दूरदर्शी व शहाणेच ठरतात. इतरांशी औदार्याची व सहकार्याची भावना ठेवल्याने परिणामी आपल्याच आत्मिक वृत्तीचे संवर्धन होते. इतरांच्या मनात आपल्याविषयी श्रध्दा, आदर व स्नेह निर्माण होतो. अशातऱ्हेने उदार व्यक्ती तोट्यात नसून लाभातच राहतात. त्यांच्या चुंबकीय आकर्षणाने सर्व बाजूने त्यांच्यावर सहकार्याचा सुखद वर्षाव होऊ लागतो.

धर्मशास्त्रांनी दानाचा महिमा मुक्तकंठाने गायिला आहे. प्रत्येक सत्कर्माशी त्याचे नाते जोडले आहे. त्याचे कारण संपत्ती एकेठिकाणी साचून न राहता तिचे अभिसरण व्हावे, हे तर आहेच पण हेही एकमेव कारण नव्हे तर उदार सहकार्य करण्याची वृत्ती प्रत्येकात विकसित व्हावी हा त्या मागचा हेतू आहे. आपण स्वत:च्याच दु:खांना दु:ख न मानता इतरांच्या दु:खातही तेवढेच संवेदनशील असावे हे त्याचे मूलभूत प्रयोजन होय. इतरांच्या दु:खाने आपल्या अंत:करणात करुणा व दया यांचे पाझर फुटत असतील तर समजावे की आत्म्याची कोमलता जिवंत आहे व व्यक्ती आत्मोन्नतीच्या मार्गावर प्रगत करीत आहे.

''जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे जो आपुले, तोचि साधु ओळखावा, देव तेथेचि जाणावा'' असे संतवचन आहे. इतरांचे दु:ख व कष्ट पाहून ज्यांना थोडी सुध्दा दया येत नाही अशी माणसे स्वत: क्रूरकर्मा बनतात. या आंतरिक अवस्थेलाच 'असुरता' असे म्हटले जाते, असे लोक स्वत:च्या स्वार्थासाठीच नव्हे तर अकारण सुध्दा परपीडेने सुखावत असतात व त्याला शौर्य असे गोडस नाव देत असतात. म्हणून माणसाने आसुरी वृत्ती सोडावी व देवत्वाची वृत्ती बाळगावी. त्यासाठी औदार्यपूर्ण सहकार्याची प्रवृत्ती त्यांच्या अंत:करणात विकसित होईल असे आचार विचार वाढविण्याची गरज असते त्यासाठीच दानाचा महिमा गायिला गेला आहे.

दान ही एक सप्रवृत्ती आहे. केवळ पैशाचे नव्हे तर श्रम, वेळ, प्रोत्साहन, स्नेह, सहानुभूती यांचे दानही श्रेष्ठ दान होऊ शकते. स्वभावात औदार्य असेल तर दानशीलता उत्स्फूर्तपणे वाढत जाईल.

******

## धुंद

न्हाऊनी हजार रंगावं
आज नाचावे मी
तुझी व्हावे म्हणूनी
अळवते तुला मी
निसर्गाचं अमोल लेणं
वाहते तुला मी
भेटण्या तुला सखे
बघ झुरते मी
नको देऊ सजा
ये तू लवकरी
मोहरलेले मन माझे
कवेत घे सत्वरी
वाट पाहते मी
घेऊनी अधिक
विचाराने रे तुझ्या
मन झाले बधीर

**कृणाल शिकारे**
बी.ए. भाग २

## प्राक्तन

निर्माल्य घेण्याचे स्वप्न
का फुलाला पडले
म्हणून कधी त्यांनी
उमलायचे का सोडले
ज्याचे त्याचे प्राक्तन
ज्यांना त्यांना मिळाले
नशीबी असूनही त्यांना
कधी का जास्त मिळाले
प्रकाशाचे दुःख ते
अंधाराला का मिळाले
म्हणुन सूर्याने कधी
उगवायचे का सोडले
जवानीचे सुख का
सर्रास मिळाले
मनात असूनही प्रेम
मज का मिळाले

**कु. पूजा बोकडे**
बी.ए. भाग २



# तुका म्हणे सुख परविया सुखे

**आकाश सोनोने**
बी.ए. भाग ३



'ज्याच्या सुखासाठी आपण प्रयत्न करतो
तो समाधानी झालेला पाहून आपल्या
मनाला एक वेगळाच आनंद मिळतो. संत
नित्यसुखी असतात कारण त्यांचा सातत्याने
दुसऱ्यांना सुखी करण्याचा प्रयत्न चाललेला असतो'

मानव सातत्याने सुख मिळविण्यासाठी प्रयत्नशील असतो. परंतु सर्वांचाच अनुभव असा आहे की सुखानंतर दु:ख येतच असते. म्हणून नित्य सुख ही कल्पनाच उभी राहत नाही. तुकाराम महाराज इतरांना सुखी करा म्हणजे तुम्हाला सुख मिळेल असे सांगतात. तुकाराम महाराजांच्या वचनामागे मोठा सिध्दांत उभा आहे. स्वत:ला सुख प्राप्त करण्याच्या हेतूने केलेला प्रयत्न जर विफल झाला तर तो प्रयत्नच दु:खाला कारणीभूत ठरतो. इतरांना सुखी करण्याच्या प्रयत्नात असे घडण्याची शक्यता कमी असते. ज्याच्या सुखासाठी आपण प्रयत्न करतो तो समाधानी झालेला पाहून आपल्या मनाला एक वेगळाच आनंद मिळतो. संत नित्यसुखी असतात कारण त्यांचा सातत्याने दुसऱ्यांना सुखी करण्याचा प्रयत्न चाललेला असतो.

ज्यांच्याकडे गडगंज संपत्ती, सुखसाधने आहेत ते जगामध्ये सुखी आहेत अशी समाजाची सुखाची कल्पना आहे. परंतु ही मांडणी सर्वथा चुकीची आहे. खरे म्हणजे देवाने सुख देण्यामध्ये कुठलाही भेदभाव केलेला नाही. एखाद्या अत्यंत भुकेला आहे त्याला पुरणाची पोळी मिळो किंवा ज्वारीची भाकरी मिळो. भूक शमविण्याचे सामर्थ्य दोन्हीतही सारखे असते. अंतिम समाधानात फरक नाही. एखादा श्रीमंत गादीवर झोपतो आणि एखादा कष्टकरी पोत्यावर विश्राम करतो. त्यावेळी झोपेपासून मिळणारे सुख साधनाशी निगडीत नाही हे स्पष्ट होते म्हणून देवाने भेदभाव केलेला आहे असे म्हणता येत नाही. कारण झोपेचे सुख दोघांनाही सारखेच असते.

ज्ञानेश्वर माऊलींनी ज्ञानेश्वरीमध्ये म्हटले आहे 'सौभाग्य पोखले । सुखाचे एथ ।' या ठिकाणी सुख सौभाग्यशाली बनले असा संकेत सहजच प्रश्न पडतो सुखाचे सौभाग्य काय असेल? माऊलींना काय सुचवायचे आहे? ही ओवी महाभारत या ग्रंथांची थोरवी मांडण्यासाठी आलेली आहे. व्यासांकडून महाभारताची निर्मिती झाली आणि त्यामध्ये सुख सौभाग्यशाली झाले. यातून असा अर्थ ध्वनित होतो की गीता तत्वज्ञान जगामध्ये येण्याअगोदरन सुखाची कल्पना ही इंद्रिय सुखापुरती मर्यादीत होती. त्यालाच ऐहिकसुख म्हटले आहे. गीत तत्वज्ञानानुसार ऐहिकसुख हे नित्यसुख नाही किंवा बऱ्याचवेळा सुख दु:खाचे मिश्रणच आहे. गीतेने आत्मसुखाची मांडणी केली माऊली म्हणतात किंबहुनी ऐसी सोये । जीवु आत्म्येयाची लाहे । तेथे तेया काही होये । तेया सुख जाणे । संतांचा बोध स्पष्ट करतो आत्मसुख. हेच शाश्वत आहे आणि एकदा ते प्राप्त झाले की ते नित्यच असते आणि मानवी देहाचे कर्तव्य हेच आहे की त्यानं आत्मसुखासाठी प्रयत्न करावा. गीतेच्या आत्मसुखाच्या मांडणीमुळे सुखच सौभाग्यशाली बनले ही महान कल्पना संतांनी रुजविली आहे.

*****

## माझ्यात 'तू'

तू माझ्या हृदयात
तू स्वप्नात माझ्या
तू नसानसात माझ्या
तू स्वरात माझ्या
तू एकांतात माझ्या
तू सुखात माझ्या
तू दु:खात माझ्या
तू सर्वस्वात माझ्या
तू तालात माझ्या
तू स्वरात माझ्या
तू गळ्यात माझ्या
तू कंठात माझ्या
तू जीवनात माझ्या
ते म्हणजे पुस्तक
'माझे'

**कु. स्वाती बैस**
बी.ए. भाग २

## मुलगी जगली पाहिजे

जन्म दयायला आई पाहिजे
राखी बांधायला बहीण पाहिजे
हट्ट पुरवायला मावशी पाहिजे
गोष्टी सांगायला आजी पाहिजे
पुरणपोळी भरवायला मामी पाहिजे
जीवनाच्या सोबतीला एकतरी मैत्रीण पाहिजे
आयुष्याच्या साथीला बायको पाहिजे
आणि हे सगळे अनुभव घ्यायला मुलगी तर
जगली पाहिजे.

**कु. रेणुका कडू**
बी.ए. भाग २

## माया

तिची माया तिची छाया
वेगळीच असते
ती असली घरात तर
चैतन्य नांदते
जिच्या विणा अंगण सुनेसुने
वाटते
देऊन संस्कार तिच घडवते
कधी होऊन कठोर ती रडवते
तिच कुशीत घेऊन माया
करते
तुझी असो वा माझी
शेवटी आईच होते.

**कु. वैष्णवी फाळके**
बी.ए. भाग २

## विचार

मंदिरातील घंटेला आवाज नाही
जोपर्यंत तुम्ही ती वाजवत नाही
कवितेला चाल नाही
कवितेला चाल नाही
जोपर्यंत तुम्ही ती गात नाही
त्याचप्रमाणे तुमच्या भावनांना सुध्दा किंमत नाही
जोपर्यंत तुम्ही त्या व्यक्त करत नाही
मन वळू नये अशी श्रध्दा हवी
निष्ठा ढळू नये, अशी भक्ती हवी
सामर्थ्य संपू नये, अशी शक्ती हवी
कधी विसरु नये, अशी नाती हवी ...

**कु. प्रतिक्षा माहुलकर**
बी.ए. भाग २

## कदर व्हावी समर्पणाची

प्रत्येक जण स्वत:साठी कमी आणि दुसऱ्यांसाठी अधिक जगत असतो. आप्तांच्या स्नेन्हयांच्या नातलगांच्या,मित्रमंडळींच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी झटत असतो. आपल्या एखाद्या कृत्याने, मदतीने, शब्दाने, स्पर्शाने त्यांच्या मुखावर हास्याची लकेर उमटावी अशी प्रत्येकाची इच्छा असते. त्यातून मिळणारं समाधान अनमोल असतं. किंबहुना, आपल्यामुळे एखाद्याच्या आयुष्यात काही सकारात्मक बदल घडणं या सारखं सुख दुसऱ्या कशातही नसतं.

कवी म्हणतो त्याप्रमाणे आपण समर्पणाला तयार असतो. एखाद्यावरुन जीव ओवाळून टाकण्यातही आपण मागेपुढे पाहात नाही. पण समोरची व्यक्ती आपल्या भावनांची कदर करणारी असेल तरच ही मनस्विता, प्रेम आणि त्यागाचा उत्कट अविष्कार कारणी लागतो. त्याचं महत्त्व कळतं. आपण एखाद्यासाठी सर्वस्व अर्पण करावं आणि त्याने त्याची किंमत शून्य करावी यासारखं दुसरं दुर्दैव नाही. म्हणूनच कवीने वरील पंक्तीमध्ये व्यक्त केलेले विचार विचारात घ्यायला हवेत.

**कु. प्रीती शेंडे**

बी.ए. भाग ३

## सुंदर जीवनाची वाट

आयुष्याची वाट किती वेगळी
असते नाही ! कधी कधी कसोटी
पाहणारी नागमोडी वळणं
असतात तर कधी दु:खाचे काटे वाटेवर
पसरलेले असतात. या काट्यांनी भरलेल्या
वाटेला वळसा घालून पुढं गेलं की
सुखरुपी फुलांच्या पायघड्या स्वागताला
तयार असतात. पण ही वाट चालताना
आपण केवळ दु:खाचाच विचार करतो
आणि आणखी दु:खी होत राहतो. पण
दु:खाचे काटे बाजूला सारले नाहीत तर सुखाची फुलं
उलमणार तरी कशी ? आपण सदैव जखमांची चिंता
करत बसतो. त्यावेळी हे विसरतो की मनाच्या
जखमा भरणारं औषधदेखील आपल्या जवळच आहे
गरज आहे ती केवळ आनंदी भावाची पोतडी
उघडण्याची ...

... आणि एकदा ही पोतडी उघडली की आयुष्यात मिळणाऱ्या जखमांचं काहीही वाटत नाही. जणू त्यांची सल नगण्य वाटू लागते. अशा पटलावर साकारणार जीवन इहलोकच्या प्रवासाचा मनस्वी आनंद घेऊ लागलं. परिपूर्ती म्हणतात ती यालाच ....

**कु. स्नेहल मुळे**

बी.ए. भाग ३

## शिवबा

अंधार फार झाला
आता दिवा पाहिजे
मराठी जनतेला आता
जिजाऊंचा शिवा पाहिजे
नेते झाले मस्तवाल
पिचली दुबळी जनता
मस्ती यांची जिरवायला
आता युवा पाहिजे
कसे जाहले कणाहिन
अन् पैशाचे भक्त
यांच्या डामडौलांसाठी आटते
गोर गरिबांचे रक्त
तर
संघर्षाची वादळी हवा पाहिजे
लाचारांच्या फौजेपुढे उभा ढाकणारा
बाणेदार मराठी युवा पाहिजे
म्हणुनच आता आम्हाला जिजाऊंचा
शिवा पाहिजे.

**वैभव नागपूरे**
बी.ए. भाग २



## बाप

बाप माझा कष्टकरी
भोळा सुदाम दिसतो
दु:ख गिळून अंतरी
सदा खुशीत असतो
माया देवून पायाशी
बाप चिंतेत बसतो
विठूराया पंढरीचा
त्याच्या मनात वसतो
दु:ख बांधून उराशी
बाप खुशीत निजतो
सूर्य येता डोईवरी
पुन्हा घामात भिजतो
काळ्या काळ्या मातीसंग
त्याचं मनही रुजतं
आटवून रगताला
शेतशिवार सजतं
पायी जाऊन वारिला
बाप स्मरे विठोबाला
देवा पाठव पाऊस
साद विठू चरणाला
बाप झटतो नेटाने
कधी दुखवत नाही
त्याचं मोल अनमोल
कुणा आठवत नाही
आई सारखाच बाप
घरासाठीच झटतो
आईचं नाव पुढे पुढे
बाप मागेच भेटतो

**पवन जाधव**
बी.ए. भाग २

## महाविद्यालयाचा पहिला दिवस

पहिल्याच दिवशी वर्गामध्ये सरांचे आगमन झाले. ओळखीचे सत्र सुरु करण्यात आले. तुमचे नाव काय? तुमचे गाव काय? असे प्रश्न विचारण्यात आले. कुणाचे बाबा वकील, डॉक्टर तर कुणाचे इंजिनिअर माझा नंबर येताच मी पटकन उभी राहिली व चटकन सांगितले. सर माझे बाबा शेतकरी आहेत. मी असं म्हणताच सगळा वर्ग हसायला लागला. मला याचा फार राग आला. मी म्हटले सर मी नाही म्हणत, या साऱ्यांचा धंदा छोटा हाय, पण या काळ्या आईची शपथ सर या साऱ्याहून माझा बाप मोठा हाय. हाडाची काडं करुन रात दिन राबत असतो, तो राबतो म्हणून तुम्ही आम्ही दिसतो. काड्या कुड्याचं जिन त्याचं पण, साऱ्या जगाला भाकर देतो अन साऱ्या जगाला भाकर देणारा कधी कधी उपाशीच झोपतो माहित नसतांना पाऊस येईल, नाही येईल, हजारो रुपये मातीत गाळतो. खरंच सर तो माती संग जुगारच खेळत असतो. सगळे जण जगण्यासाठी जुगार खेळतो. अन् या जगण्याच्या जुगारीमध्ये तो नेहमीच हरतो. माणुसकीच्या गावामध्ये अजून त्याची वस्ती हाय खरंच सर माझ्या बापाची मरणा संग दोस्ती हाय फाटके तुटते कपडे सर, तो अजुनही अंगावर घालतो पण, सर मला तुमच्या कपड्याचाही त्याच्याच घामाचा वास येतो. टाकून पहा मातीत सर तुम्ही पाच-पन्नास हजार तेव्हाच तुम्हाला कळेल, त्याच्या जगण्याचा जुगार म्हणून म्हणते सर अभिमान हाय मला माझा बाप शेतकरी असल्याचा अभिमान हाय मला.

**कु. राखी डोईफोडे**

बी.ए. भाग ३

## भय इथले संपत नाही

''भय इथले संपत नाही
मग तुझी आठवण येते
मी संध्याकाळी गाणी गातो
तू मला शिकवलेले गित''

केवळ शब्दांचा अर्थ कळला म्हणजे कविता कळली असे होत नाही. तर जी कविता विचार करायला प्रवृत्त करते किंवा त्याचया शब्दामागील सर्वांचा वेध घ्यायचा प्रयत्न करायला लावते तीच खरी कविता त्यातल्या त्यात 'भय इथले संपत नाही' या कवितेचे रसग्रहण करण्याचा कवी मनात डोकावण्याचा प्रयत्न अनेक जणांनी केला. कोणाला ही कविता मृत्यूची वाटली तर कोणाला ही कविता आईबद्दलची वाटली, तर कोणाला ही कविता संपूर्ण जीवनाबद्दलची वाटली. जसं जगप्रसिध्द मोनालिसाच्या चेहऱ्यावरच्या स्मिताचा अर्थ वेगवेगळ्या तऱ्हेने लावला जातो, तसे या कवितेचे आहे. लहान मुलाला भीती वाटली की तो जसा त्याच्या आईकडे धावत जातो, त्याला आईची आठवण होते, तीच भावना या पहिल्या चार ओळीत व्यक्त झाली आहे. जिवंतपणी चार ओळीत व्यक्त झाली आहे. जिवंतपणी मृत्यूचे भय असल्याने 'भय इथले संपत नाही.'

मानवी जीवनातील सगळ्यात भयप्रद घटना म्हणजे मृत्यू. मृत्युची सर्वांना भिती वाटते. मृत्यूकडे एक अप्रिय पण अपरिहार्य अशी घटना म्हणून पाहिले जाते. मृत्यू कोणालाच नको असतो. आज अनेक रोगांनी त्रस्त झालेले लोक जरी तोंडाने म्हणत असले, मला घेऊन जाशील तर बरे होईल: तरीसुध्दा हा देह सोडण्याची त्यांची प्रामाणिक तयारी झालेली नसते. याचे कारण मृत्यूबद्दल वाटणारे भय, मृत्यूनंतरच्या जीवनाबद्दलची अशाश्वती हे असते. म्हणून, मृत्यू म्हणजे काय, मृत्यूनंतर काही अस्तित्व उरले काय, मृत्यूमुळे आपली सुटका होते की आपण अडकतो या सगळ्या गोष्टींची उत्तरे प्रत्येक जण आपल्या ज्ञानाप्रमाणे, श्रध्देप्रमाणे, धर्माप्रमाणे किंवा कुवतीप्रमाणे शोधण्याचा प्रयत्न करतो.

**वेदप्रकाश शुक्ला**

बी.ए. भाग ३

## माझा महाराष्ट्र

राज्यामध्ये महाराष्ट्र महाराष्ट्र असे महान
या महान राष्ट्राचे आम्ही गातो गुणगान

फुले, टिळक, आगरकर इथे जन्मले बाल
स्वातंत्र्यासाठी त्यांनी भोगिले किती हाल

गिरीवरती सुंदर लेणी, मंदिरे कृष्ण पाषाणी
तुकड्याची अभंगवाणी, लतादिदींची मंजूळ गाणी

आनंदीबाई जोशी पहिल्या महिला डॉक्टर
कृष्णा पाटील ने केले शिखर एव्हरेस्ट सर

भीमा, कृष्णा, गोदावरी अन उत्तुंग सहयागिरी
या राज्याची राजधानी माझी मुंबई नगरी

डफाच्या थापेवरती गर्जेशिवबाचा पोवाडा
जाखडी अन् लावणीने सारा देश झाला वेडा

**कु. भावना मानकर**
बी.ए. भाग २



## मोबाईल येड

मोबाईल, मोबाईल, मोबाईल
मोबाईलचा लागला नाद,
मोबाईलच्या नादामुळे
झाले सर्व बाद
पोट्टे नुसते मोबाईल
मोबाईल करते,
अन् करुनशानी राजे हो
मोबाईलातच जावुन मरते
लहान-लहान लेकर आता
मोबाईलातच रायते,
काय ते फेसबुक
अन् वाट्सअॅपचे पायते ....
काय बाप्पा पोरायले
मोबाईलानं येडं केलं
आई-बाप पोरगं सगळं
विसरुनशानीच गेलं ...
म्हणूनशानी म्हणते ऐकूण घ्या खरं
मोबाईलचा वापर कमी करा बरं
तुमच्या ज्ञानाचा वाढणारा झरा
जीवनात येईल आनंदाचा वारा ...

**कु. रेखा शेगोकार**
बी.ए. भाग २



# यशाचा कानमंत्र

प्रत्येकालाच यश हवं असतं. मात्र यशस्वी होण्यासाठी, नाव कमवण्यासाठी काही किंमत मोजावी लागते. ही किंमत मोजण्याची तयारी ठेवली आणि थोडी मेहनत केली तर तुम्ही देखील या यशस्वी लोकांच्या पंक्तीमध्ये स्थान मिळवू शकतात.

यशाचा पहिला मंत्र म्हणजे शब्द आणि वेळ पाळणं. तुम्ही दिलेला शब्द आणि वेळ पाळायलाच हवी. एखादं काम विशिष्ट वेळेत करण्याचं कबूल केलं असेल तर वेळेआधीच ते पूर्ण करायचा प्रयत्न करा. नियोजनाअंती हे सहजशक्य होईल. मुख्य म्हणजे आपण वेळेत पूर्ण करु असा विश्वास असल्यासच एखाद्याला शब्द दया. सहकर्मचाऱ्यांना मदत करणं हा यशस्वी आणि लोकप्रिय होण्याचा उत्तम मार्ग आहे. दुसऱ्याला मदत केल्याने आपल्याला काही नवीन शिकायला मिळत असतं. यामुळे मदत करताना मागे राहू नका. प्रसंगी आपणहून मदत देऊ करा. तुमचा स्नेहपूर्ण व्यवहार प्रगतीस चालना देईल. कार्यक्षेत्रामध्ये हृदयापेक्षा डोक्याने काम करणं इष्ट ठरतं. बरेचदा मन नाखूष असतं. विविध कारणानं व्यथित असतं. मात्र, कार्यक्षेत्रामध्ये पाऊल ठेवल्यावर मनातली ही नकारात्मकता दूर करायला हवी. कारण या नकारात्मकतेचा कार्यक्षमतेवर स्पष्ट परिणाम बघायला मिळत असतो. म्हणूनच घरातील ताणतणाव ऑफीसमध्ये आणू नका.

एखाद्या कामाबाबत सविस्तर माहिती असल्यास आणि आपण ते काम पूर्ण करु असा शंभर टक्के विश्वास असल्यासच ते काम स्वीकारा.

**कु. दामिनी पवार**

बी.ए. भाग ३

# खरे शिक्षण

आज बरेच जग इंजिनियर, डॉक्टर होत आहेत. कॉम्प्युटर, इंटरनेटच्या युगात वावरत आहे. त्यामुळे ते उच्च पदावर नोकऱ्या करीत आहे. एकूण त्यांना ऐहिक सुख-संपन्नता लाभत आहे. आणि ही नक्कीच आनंदाची गौरवाची गोष्ट आहे. पण यासोबत जर आध्यात्मिक आणि नैतिक शिक्षण मिळाले असते तर दुधात साखर पडल्यासारखे झाले असते. पण तसे नसल्यामुळे आज सर्वत्र एकमेकाविषयी प्रेम, आपुलकी सहानुभूती यासारख्या गोष्टींचा अभाव दिसून येतो.

नुसती पुस्तकी विद्या उपयोगाची नाही. आपल्याला जीवन घडविणारे 'माणूस' निर्माण करणारे चारित्र्य घडविणारे, मानसिक बल वाढविणारे बुध्दी विशाल करणारे आणि स्वावलंबी बनविणारे तसेच चांगले विचार आत्मसात करणारे शिक्षण हवे आहे.

**कु. स्नेहा पानेकर**

बी.ए. भाग ३

# कवी, साहित्यिक व त्यांची टोपण नाव

| | | | |
|---|---|---|---|
| १) | कृष्णाजी केशव दामले | – | केशवसुत |
| २) | राम गणेश गडकरी | – | गोविंदाग्रज, बाळकराम |
| ३) | वि.वा. शिरवाडकर | – | कुसुमाग्रज |
| ४) | त्र्यंबक बापूजी ठोंबरे | – | बालकवी |
| ५) | शंकर केशव कनिटकर | – | गिरीश |
| ६) | प्रल्हाद केशव अत्रे | – | केशवकुमार |
| ७) | आत्माराम रावजी देशपांडे | – | अनिल |
| ८) | दिनकर गंगाधर केळकर | – | अज्ञातवासी |
| ९) | काशिनाथ हरी मोडक | – | माधवानुज |
| १०) | विनायक जनार्दक करंदीकर | – | विनायक |
| ११) | यशवंत दिनकर पेंढारकर | – | यशवंत |
| १२) | नारायण सुर्याजीपंत पराडकर | – | मोरोपंत |
| १३) | दत्तात्रय कोंडेघाटे | – | दत्ता |
| १४) | नारायण मुरलीधर गुप्ते | – | बी |
| १५) | चिंतामन त्र्यंबक खानोलकर | – | आरतीप्रभू |
| १६) | शंकर काशिनाथ गर्गे | – | दिवाकर |
| १७) | गोपाळ हरी देशमुख | – | लोकहितवादी |
| १८) | माधव त्र्यंबक पटवर्धन | – | माधव जुलियन |

**कु. रितू पोहणकर**
बी.ए. भाग २



# राष्ट्रप्रेमाची गंगा वाहू दे

**कु. नीलीमा चोपकार**
बी.ए. भाग ३

व्यक्तिगत धर्म समाजधर्म आणि राष्ट्रधर्म हे तीन प्रमुख होत. व्यक्तिगत धर्म व्यक्तीच्या सुख-समुध्दी आणि विकासासाठी असतो. समाजधर्मात व्यक्ती आणि समाजाच्या विकासाचा विचार होतो. तर राष्ट्रधर्मात व्यक्ती, समाज आणि राष्ट्र हया तिघांच्या विकासाचे उद्दिष्ट समाविष्ट असते. म्हणजेच एका राष्ट्रधर्माच्या अनुपालनाने इतर दोन्ही धर्माचे फळ आपोआप प्राप्त होते. म्हणून तिन्ही धर्मात राष्ट्रधर्म सगळ्यात जास्त महत्वपूर्ण आहे. तन-मन-श्रम-साधना-व्यवसाय-विचार कला-विज्ञान-धर्म-आध्यात्म यांचा प्रसार करुन राष्ट्रसेवा करणे, त्याच्या सुखी-शांती-समृध्दी आणि प्रगतीसाठी निष्ठेने प्रयत्न करणे हाच राष्ट्रधर्म आहे. म्हणूनच राष्ट्रधर्म सर्वात मोठा धर्म मानला गेला आहे.

माणूस ज्या मातृभूमीच्या अंगाखांद्यावर खेळत लहानाचा मोठा होतो ज्या संस्कृतीचा वारसा घेऊन आपले जीवन सुसंस्कृत करतो जन्मापासून मृत्यूपर्यंत जिच्या अनेकानेक उपकार-अनुदानाने अनुग्रहित होऊन उन्नती करणे, त्या राष्ट्रभूमीप्रती त्याचे आदय कर्तव्य असते की मातृभूमीच्या प्रगती-विकासाबाबत विचार करणे व असे आचरण आत्मसात करणे ज्या योगे सगळ्यांचे कल्याण साध्य करता येईल. असे केल्यावरच आम्ही खऱ्या अर्थाने राष्ट्रऋणातून मुक्त होऊ शकू. ऋणातून मुक्त होऊन त्याचे उतराई होणे हीच खरी कृतज्ञता आहे. मातृभूमीला मातृतुल्य मानले गेले आहे. ज्या देशाचे आपण नागरिक आहोत. ज्या भूमातेने आम्हास जन्म दिला. साधन-सुविधांच्या योगे 'माणूस' म्हणण्यायोग्य बनविले ती भूमी खचितच आई आहे. म्हणूनच तर आम्ही आपल्या देशाला भारत माता संबोधतो. बाळ आईशिवाय कसे राहू शकेल? जगले वाचले तरी ते निष्क्रिय मातीचा गोळाच राहणार. कोणतेही आकार-रुप त्यास प्राप्त होणार नाही. तीच गोष्टी मातृभूमीलाही लागू पडते. माणूस ज्या देशाचा नागरिक असतो तिथेच त्याला प्राथमिक शिक्षण व ज्ञान मिळत असते. त्याच्या निर्माण प्रगती समृध्दी व राष्ट्राची साधन संपत्ती कामी पडते आणि त्यामुळेच तो एक योग्य सुजाण नागरिक घडतो. हया दृष्टीने जर जननी आणि जन्मभूती एकाच श्रेणीतील असून त्यांना स्वर्गापेक्षाही महान श्रेष्ठत्व प्रदान केले गेले आहे. कारण स्वर्गात तर फक्त सुख-आनंदच प्राप्त होतो पण आई-जन्मभूमीच्या कुशीत आनंद प्राप्त बरोबरच योग्य पिढी आणि नागरिक देखील घडले जातात.

*****



## दुष्काळ

तू कोसळता ही रडवितो
न कोसळता ही रडवितो
ही कसली निसर्गाची करणी
बिया सकट फाटली धरणी ।
जगण्याचा आधार आमचा
उन्हात पोळून करपला
कोळसा झाला पिकाचा
सदा शाप आम्हा दुष्काळाचा
धन धान्य वाहून गेला
धनी बी फासावर मेला ।
या दुष्काळानं आमच्या
कित्येक पिढ्या नेल्या
बैलासकट नांगर गेला ।।
उचलून सावकारानं
सासऱ्यालाही पिडलय आता
हृदय विकारानं ।।
सांत्वन देण्यापाई
आल्या कित्येक धरुन ताफा
आश्वासनाच्या मारल्या
त्यांनी नुसत्या पोकळ वाफा ।
कितीही शेतकरी मेला
सरकार सदा अपयशी
कधीच संपणार नाही का
आमचे नाते दुष्काळाशी

**कु. कोमल शिंगणजुळे**
बी.ए. भाग २

## अगं अगं सुनबाई

पाया पडते सुनबाई बंद कर तुझी चाल
पहिलं तुझं व्हॉटस्ॲप चुलीमंदी घाल
रोज नवे नवे ड्रेस नवे काढतीस फोटू
रडून रडून उपाशीच झोपून जातो छोटू
डीपी फीपी बदलता बदलता करपून जाते डाळ
पहिलं तुझ व्हॉटस्ॲप चुलीमंदी घाल

लगीन झालंय आपलं शहाण्यासारखं वागावं
चार दिवसाच सासू साखर, तोंड भरुन बोलावं
आम्ही मरुन गेल्यावर बस वाजवत टाळ
पहिलं तुझ व्हॉटस्ॲप चुलीमंदी घाल

रोज एक मेनू बनवतेस वाजवतेस झोपाया बारा
पुलाव असतो चांगला, पण त्यात दगड अन गारा
ठुनूक टुन वाजतो टोन, पोरी लक्ष थोड टाळ
पहिल तुझ व्हॉटस्ॲप चुलीमंदी घाल

डोळ्याला लागेल चष्मा, अंगठा होईल बाद
खरंच सांगते सुनबाई, घ्या चांगला नाय नाद
मान्य हाय दुनिया गेली चंद्रावर
पण मान-मर्यादा पाळ पाया पडते
सुनबाई आता तरी ही गोष्ट पाळ
पहिलं तुझ व्हॉटस्ॲप चुलीमंदी घाल.

**कु. दिव्या गायकवाड**
बी.ए. भाग २

# जखमा उरातल्या

'जखमा उरातल्या
कहा जख्य खोल बैठा पगले
ये नमक का शहर हैं ।'

वेदना प्रत्येकाला सतावतात. कोणाच्या मखमली, कोणाच्या भळभळत्या वर कोणाच्या हळव्या एवढाच तो फरक ..... पण कितीही प्रयत्न केला तरी सुखी माणसाचा सदरा सापडणं कठीण तसंच वेदना रहित मन ही अशक्यप्राय गोष्ट ! सुखाचा शोध घेणं हा माणसाचा स्वभाव आहे तर त्या वाटेवर अपेक्षाभंगाचे अपमानाचे काटे पसरणं हा परमेश्वराचा खोडसाळपणा आहे. असं असताना आयुष्याच्या प्रवासातला हा अनिवार्य टप्पा असेल तर घायाळ होणं ओघानेचं आलं. पण कवी म्हणतो त्याप्रमाणे त्या झाकून ठेवण्यातच शहाणपण असतं. तो म्हणतो तसं महासागरातील पाण्यातच नव्हे तर लोकांच्या वृत्तीत, नजरेत कडवेपणा, खारेपणा काठोकाठ भरलेला असतो. मलम लावण्याऐवजी जखमेवर मीठ चोळणाऱ्यांची संख्याच जास्त असते. दुसऱ्यांच्या जखमा चघळत्या ठेवण्यातच त्यांना स्वारस्य असतं. म्हणूनच उघड्या घेऊ पाहणाऱ्या उरातल्या जखमा झाकून ठेवण्यातच शहाणपण असतो.

**कु. रोशनी माहोरे**

बी.ए. भाग ३

# देह देवाचे मंदिर

मानवी देह जिवाच्या सगळ्यात जवळ असलेली वस्तू आहे. ज्यांनी त्याला जाणले ते त्यांनी त्याला दूर्लभ म्हटले आहे. देहाचे अज्ञान असलेल्या लोकांनी त्यांचा चुकीचा वापर केला. 'हा माझा मुलगा आहे' असे म्हणून सहज मुलाच्या देहावर आपला मालकी हक्क गाजवितो. पण देहासाठी कुठले मटेरियल वापरले व त्यातली ऊर्जा कुठून आणली याचे उत्तर आपल्याजवळ नसते. आपणा स्वत:ला कळले पाहिजे याचे नाव ज्ञान आहे. त्या नजरेने समर्थ रामदासानी देहाकडे पाहिले आणि आपसूक त्यांच्या तोंडातून शब्द बाहेर पडले. 'धन्य धन्य हा नरदेह येथील अपूर्वता पाहो जो जे वांछिल तो ते लाहो प्राणी जात .....' मानवनिर्मित ताजमहल किंवा चीनची भिंत याचे आश्चर्य कुठल्याच संतांना वाटले नाही. त्यांच्या नजरेत रत्न हे पाषण नसून पाणी, अन्न, सुविचार हीच तीन रत्ने आहेत आणि देह हा हाडामासाचा गोळा नसून संसार व परमार्थाला जोडणारा सेतू आहे.

'देह सत्कर्माचा मळा
देह प्रयोगाची शाळा
दिसतो विवेक सगळा मानवदेही'

असे महानुभाव म्हणतात, याच देही रामायण, महाभारत, वेद, उपनिषद, गीता, महावीर, बुध्दांचे विचार जन्माला आहे. म्हणून ते धन्य आहे. सिंह माणसापेक्षा पराक्रमी त्याला माणसाने पिंजऱ्यात बंद केले. हत्ती बलवान पण त्याच्या मानगुटीवर बसला. पक्षाहून उंच व जलचरापेक्षा सागरतळ गाठला. म्हणून तो धन्य आहे. 'देह देवाचे मंदिर आत नांदे परमेश्वर ...'

**विकी चतुरकार**

बी.ए. भाग ३

## अनाथ

ओलावले माझे डोळे
झाल्या पापण्या बोजड
किती आवरतो परी
मज आवरे ना रड
उभ्या जगाच्या गर्दीत
रोज शोधतो मी तुला
भेट निदान एकदा
तुझ्या टाकलेल्या लेकराला
दिले टाकून गं मला
केरकचऱ्या समान
भला माणूस गं कोणी,
दिले मला जीवदान
मी जाणतो गं माये,
तुझ्या मेल्या मनाच्या यातना
का शिक्षा मला अशी;
काय केला गं मी गुन्हा
तुटे तीळ तीळ जीव,
वाटे कुशीत शिरावे
अनात म्हणोनी ना मला
कधी कुणी हिनवावे
कुण्या हैवानाने माये,
तुला मातृत्व लादले
फुलण्याच्या आधी
फुल खुडून टाकले
नको टाकू गं तू अशी
माये तू पोटच्या लेकराला
न पडो तुजवीन जिणे,
कुण्या तान्हुल्या बालकाला

**कु. साक्षी खंडारे**
बी.ए. भाग २

## दोन शब्द जगण्यासाठी

कुणाला आपला कंटाळा येईल
इतकं जवळ जावू नये.
चांगूलपणाचे ओझे वाटेल
इतके चांगले वागू नये.
कुणाला गरज नसेल आपली
तिथे रेंगाळत राहू नये
नशीबाने जुळलेली नाती जपावी
पण स्वतःहून तोडू नये
गोड बोलणे गोड वागणे
कुणास अवघड वाटू नये
जवळपणाचे बंधन होईल
इतके जवळचे होऊच नये
हवे हवेसे असतो तेव्हाच
पटकन दूर निघून जावे
आपले नाव दुसऱ्याच्या ओठी
राहील इतकेच करुन जावे.

**कु. प्रियंका गोल्हरकर**
बी.ए. भाग २



# खरे यश

आयुष्यात बऱ्याचशा गोष्टी तुम्ही करता ते त्यापासून सुख मिळते. म्हणून जीवनात तुम्हाला काय हवे असते तर सुख. तुम्हाला पैसे कशासाठी हवे असतात तर सुख मिळविण्यासाठी. कोणत्याही प्रकारची कोणतीही गरज ही शेवटी सुखासाठी असते. सुखाचेही वेगवेगळे स्तर आहेत. एक आहे शारीरिक -तुम्ही जर गवतावर बसला असाल तर तुम्हाला वाटते की, गवत असे असते तर बरे झाले असते. दुसरे आहे मानसिक सुख हे तर आणखीनच आवश्यक आहे. जरी तुमचे घर सुखदायी असले, पण मन सुखी नसते तर तुम्ही त्या आरामदायी गादीवरही नीट झोपू शकणार नाही आणखी एक आहे भावनिक सुख. तुमच्याकडे सगळे व्यक्ती तुमच्याशी बोलत नसेल किंवा त्याने तुम्हाला दुखावले असेल, तुमचे भावनिक सुख गेलेच. आणखी एक म्हणजे आध्यात्मिक सुख हे सुख आत्म्याचे असते. पूर्ण शांती आतून घेणारा अखंड असा शांती आणि आनंदाचा झरा. असे सुख म्हणजे तुम्ही स्वतः आहात तसे असणे, सुख कुठे असते? ते शरीरात असते की मनात? ते दोन्हीचा मिलाफ असते. कधी-कधी शरीर सुखी असेल तर मनही सुखी नसतो आणि मन सुखी नसेल तर शरीर सुखी नसते. शरीरापेक्षा मनाचे सुखी असणे जास्त महत्वाचे मन शरीरापेक्षा तिप्पट जास्त सामर्थ्यवान असते. त्यामुळे मानसिक सुख हे शारीरिक सुखापेक्षा तिप्पट जास्त महत्वाचे असते. सुख हे बांधिलकी/वचनबध्दतेवर अवलंबून असते. इतरांची वचनबध्दता तुम्हाला सुख देते.

**संदीप गायगवई**

बी.ए. भाग ३

# ज्ञानाजवळ प्रेम उत्तम

जगाला आधी प्रेम दयावे की ज्ञान? ज्ञान सर्वांना कळत नाही. त्याला बौध्दिक पात्रता लागते. केवळ ज्ञान रुक्ष असते. तुकाराम महाराज म्हणतात -

'आणिक नये माझ्या मना
होकां पंडित शाहाणा'

आपण यंत्रात ज्ञान लोड केले, पण त्याला भावना कुठे? त्याजवळ जिव्हाळा असतो का? म्हणून ज्ञानावर प्रेमाची सत्ता हवी. जगाला ज्ञानाची गरज आहे पण भूक प्रेमाची असते. प्राण्यासोबत मैत्री फक्त ज्ञानाने होत नाही. तिथे प्रेम लागते. हे हेमलकसा येथे प्रकाश आमट्यांच्या घरी कळते. प्रेम वाघाला व सापालाही मित्र बनविते. महर्षी नारदांनी भक्तीचे वर्णन करताना म्हटले आहे. ''सात्वास्मिन्परमप्रेमरुपा''

भक्ती परम प्रेमरुप आहे. भक्ती प्रेमाचा ओलावा घेऊनच मोठी होते. फुलाला कळी न घेता कसे फूल होता येईल, दुधाचे दही दहयाचे लोणी व लोण्याचे तूप असा हा विकासक्रम कसा टाळता येईल. प्रेम हे जात, धर्म, प्रांताच्या सीमा ओलांडून पलीकडे जाते. ज्ञानही जाते, पण प्रेमाची पकड घट्ट दिसते. संत तुकाराम महाराज व अनगडशाहा हा मुस्लीम फकीर दोघांची जात वेगळी धर्म वेगळा, मग मैत्री कशी जमली याचे उत्तर कबिरांनी भजनात असे दिले आहे. 'सबसे उची प्रेम सगाई' प्रेमाचा स्वभाव ज्ञानापेक्षा निराळा ज्ञानात गणित व प्रेमात भावना असते. ज्ञानात दंभ व प्रेम नम्र आहे. ज्ञान वर सरकते. प्रेम खाली झरपते. ज्ञान प्रकाश आहे. प्रेम क्षमा करते. ज्ञान भेद सांगते. प्रेम अभेदात नेते. ज्ञान शब्दातून व प्रेम कृतीतून येते. ज्ञान दुःख ओळखते, प्रेम मदत करते. ज्ञान ताठर प्रेम लवचिक आहे. पैठणच्या नाथांनी लोकांनी उन्हात मूल रडताना पाहिले, पण प्रेमळ नाथांनी त्याला कडेवर घेतले. एक सुशिक्षित मुलगा बापाला वृध्दाश्रमात पाठवितो व दुसरा दुबईतून मुलगा बापाला फोन करुन विचारतो, पप्पा तुम्ही वेळेवर जेवता का? गोळ्या वेळेवर घेत जा. तेव्हा बापाला दुबई लांब असून जवळ वाटते व दुसरा जवळ असून लांब वाटतो. खरच प्रेम निरुपम आहे. श्रीचक्रधर म्हणजे मूर्तिमंत्र प्रेम होते. त्यांनी समताही ममतेने सांगितली. ज्ञानाचे महत्व कमी न करता प्रेमाचे त्यांनी उदात्तीकरण केले आहे. ज्ञानाला न दुखावता म्हणाले, 'ज्ञानाजवळ प्रेम उत्तम'

**सुरज किर्तकार**

बी.ए. भाग ३

## काट्टं

कविता जुळवणं जरी
असला शब्दांचा खेळ
तरी कविताच जुळवते
अनोळखे मनांचे मेळ ...
ते शब्द आपुलेसे वाटतात
अन् डोळ्यासमोर आठवणी साचतात
काट्टयाच्या रुपाने नजर
शोधू लागते प्रसंग
एकरुप होऊन त्या काट्टयाशी
आठवणीचे उमटू लागतात तरंग
जे बोलू शकत नाही
ते उमटवते शाई
कारण काट्टयाशिवाय माझ्याकडे
पर्यायच उरत नाही.

**कु. शुभांगी खत्री**
बी.ए. भाग २



## त्याला रडवते भाकर

जगाचा पोशिंदाच इथे आहे बनला चाकर
वीतभर पोटासाठी त्याला रडवते भाकर !

पिकवते जो धान्य त्याला मिळेल हो अन्न
कर्जापायी चेहरा दिसतो उदास अन् खिन्न
पिकवतो कापूस त्याचा घरी दिसेना वाकर
वीतभर पोटासाठी त्याला रडवते भाकर !

वावभर जागा असो घाम गळतो शेतात
निसर्ग रुसतो तेव्हा काही मिळेना हातात
शासनाला वाटे तो जसा सर्कशीचा जोकर
वीतभर पोटासाठी त्याला रडवते भाकर !

जरी मालकीचे शेत त्याच्या हातामंदी नाही
त्यास आपल्या पिकाले भाव देता येत नाही
जीव फासला टांगला तो ठरल्यावर नोकर
वीतभर पोटासाठी त्याला रडवते भाकर !

त्याचे उघडे नागडे आहे उपाशी लेकरं
दलालाचे गुबरे ढोरं देती खाऊन ढेकरं
याचा रिकामाच खिसा त्याचा भरे लॉकर
वीतभर पोटासाठी त्याला रडवते भाकर ...

**कु. ज्योती जेवडे**
बी.ए. भाग २

## काळ - वेळेचा धडा

'समय गूंगा नही
बस मौन है,
वक्त पर बताता है
किसका कौन है'

माणसानं नेहमी वेळेचं आणि परिस्थितीचं भान ठेवावं असं सांगितलं जातं. याचं कारण जीवनात या दोन गोष्टी अतिशय महत्वाच्या ठरतात. कधी कोणावर कोणती वेळ येईल हे सांगता येत नसलं तरी ती वेळही बरंच काही शिकवून जात असते. विशेषत: कठीण प्रसंगात खरी कसोटी असते. खरच आपलं कोण, परकं कोण हे पारखण्याची संधी या निमित्तानं प्राप्त होते.

आयुष्यात कौतुक करणारे अनेक जण भेटतात आणि त्यातून आपल्याला समाधानही मिळतं. तुमच्या उत्तम परिस्थितीचा लाभ घेण्यासाठी ही अनेकजण प्रयत्नशील असतात.

मात्र, तुमच्यावर कठीण वेळ येताच यातील किती पाठीशी उभे राहतात, हा खरा प्रश्न असतो. म्हणून आलेल्या प्रसंगाबद्दल वाईट वाटून न घेता किंवा त्याचं भांडवल न करता त्यातून योग्य तो बोध घ्यावा. तो आयुष्याच्या पुढील वाटचालीसाठी महत्वाचा ठरतो. आपलं नेमकं काय चुकलंय याचं आत्मपरीक्षण करण्याची संधीही या निमित्तानं प्राप्त होते.

**राहुल मेकळे**

बी.ए. भाग ३

## हृदय जपणारी चतुसुत्री

हृदयविकार होऊ नये तसेच जडलेला हृदयविकार नियंत्रणात राहावा यासाठी योगासने-प्राणायाम ध्यानधारणा, शाकाहार आणि आनंदी मनोवृत्ती या चतुसुत्रीचा वापर करावा. हृदयविकाराला आळा घालायचा तर आहारात बदल करण्याला पर्याय नाही. कोणताही विकार उद्भवण्याला मानसिक-भावनिक ताणतणाव प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या कारणीभूत ठरतात. आज सर्वत्र महत्वाकांक्षी कामाला सर्वस्व मानणाऱ्या, सदैव धावपळीत असलेल्या व्यक्तीची संख्या वाढत आहे. या व्यक्तींना 'टाईप ए पर्सनॅलिटी' असे संबोधले जाते. उद्दिष्टे वेगाने साध्य करताना या व्यक्तींना भावनिक ताणतणावांना सामोरे जावे लागते. या प्रक्रियेत त्यांच्या शरीरातील रक्तवाहिन्यांवर ताण पडून या आकुंचित होत असतात.

**कु. प्रतिक्षा मेश्राम**

बी.ए. भाग ३

# आधी क्षमता ओळखा

'बेहतर से बेहतर की तलाश करो
मिल जाये नदी तो समंदर की तलाश करो
टूट जाता है शीशा पत्थर की चोट से
टूट जाये पत्थर ऐसा शीशा तलाश करो'

प्रत्येकजण काही ना काही ठरवत असतो. पण इथे अनेकांची गल्लत होताना दिसते. काही जण क्षमता असनूही ध्येयाबाबत अल्पसंतुष्टता दर्शवतात तर काही क्षमतांची नेमकी पारख न करता आवाक्याबाहेरच्या ध्येयांपाठी धावताना दिसतात. मात्र अशा टोकाच्या भूमिका न घेता सम्यक विचार ठेवून भविष्याची आखणी केली तर तुम्ही आयुष्याला सुंदर वळण देऊ शकत असंच कवी सांगू पहात आहे. सदर काव्यपंक्तीमध्ये मोठी स्वप्न बघण्याचं सूचित केलं आहं. प्रत्येकाने कर्तृत्वाचा परीघ विस्तारायला हवा. असा विचार यातून व्यक्त होत आहे. सबळ, सशक्त आणि सामर्थ्यशील बनावं असं कवी सांगतो. मात्र हे करताना आधी आपली ताकद ओळखणं गरजेचं आहे. नदीत पोहणाऱ्याने समुद्रापर्यंत पोहोचण्याचं स्वप्न नक्की बाळगावं मात्र वादळवाऱ्यांचा सामना करण्याची, लाटांवर स्वार होण्याची, वाळू निसटू लागल्यावर सावरण्याची ताकद आधी मिळवावी.

**प्रद्युमन्य आमले**

बी.ए. भाग ३

# बुद्धिमत्ता

एका नगरीत एक राजा राज्य करीत होता. राजाकडे अपार संपत्ती होती. तसेच स्वतःच्या बुध्दिचातुर्याने व पराक्रमाने त्याने आपल्या शत्रूना जिंकले होते. अनेक विद्वान त्याच्या पदरी होते. फक्त हा राजा खूपच कुरुप होता.

एकदा त्याच्या दरबारात एक अत्यंत लावण्यवती नर्तिक तिचे नृत्यकौशल्य सादर करण्यास आली. राजाने परवानगी देताच राजाला मुजरा करुन तिने तिच्या नर्तनास प्रारंभ केला. ती अत्यंत सुंदर नाच करीत होती. तिचे सौंदर्य व तिचे बहारदार नृत्य यांचा अप्रतिम असा संगम दरबारात झाला होता. राजासहीत सर्व दरबारी मंत्रमुग्ध झाले होते.

नृत्याचा कार्यक्रम संपला. त्या नर्तकीला राजाने अनेक भेटी दिल्या, द्रव्यही दिले. राजधानी सोडण्याआधी राजाचा निरोप घेण्यासाठी जेव्हा ती आली तेव्हा तिन राजाला विचारले, ''महाराज राग येणार नसेल तर एक प्रश्न विचारते, राजाने संमती देताच ती म्हणाली'', ''ब्रह्मदेवाने जेव्हा सौंदर्य वाटले तेव्हा आपण हजर नव्हता का?'' तेव्हा राजा चटकन म्हणाला, ''अग, तू जेव्हा सौंदर्य मिळवण्याच्या रांगेत उभी होतीस तेव्हा मी बुध्दिमत्ता मिळवण्याच्या रांगेत उभा होतो. त्यामुळे तुला सौंदर्य मिळाले व मला बुध्दिमत्ता पण म्हणूनच आज मी तुझ्यासारख्या अनेकांना माझ्या इशाऱ्यावर नाचवू शकतो.''

हे ऐकताच नर्तिका मान खाली घालून निघून गेली. सौंदर्यापेक्षा बुध्दिमत्ता ही केव्हाही श्रेष्ठ असते !

**राजु मरसकोल्हे**

बी.ए. भाग ३

# वही तो इन्सान है

‘जिंदगी काटों का सकार है,
हौसला इसकी पहचान है,
रास्ते पर तो सभी चलते हैं,
जो रास्ते बनाये वही इन्सान है ।’

देवाने सजीवसृष्टी निर्माण केली मात्र सर्व जीवांपेक्षा मानवाकडे वेगळी क्षमता दिली. या क्षमतेच्या बळावरच आपण अन्य प्राणीमात्रांवर, सृष्टीवर अधिराज्य गाजवत आहोत. विचारांची वेगळी दिशा आणि प्रयत्नांचा वेगळा बाज असेल तर प्रत्येकाचं आयुष्य विविध रंगांनी फूलू शकतं. मात्र ते नेहमी सुकर, सहज असेल अशी करण्यात अथवा तशी इच्छा बाळगण्यात अर्थ नाही. कारण हे स्वप्न अपुरे राहण्याचीच दाट शक्यता असते. अर्थात यामुळे खर होण्यातही काही अर्थ नसतो. कारण एक रस्ता बंद होतो तेव्हा आपल्याही नकळत दुसरा शोधण्याची प्रेरणा मिळालेली असते. एक कवाड बंद झाल्यास आपल्यासाठी दुसरं कवाड उघडलेलं असतात. अनवट वाटेवरुन चालण्याची, नवे रस्ते धुंडाळण्याची, स्वत:ती क्षमतांचा योग्य तसा आणि योग्य तिथे वापर करण्याची शक्ती माणसाकडे आहे. फक्त तिचा वापर करायला हवा.

**कु. प्रियंका तायडे**

बी.ए. भाग ३

# किंमत समजा

‘हमने कब कहा के
किंमत समझो तुम हमारी
गर हमे बिकना ही होता
तो आज यूं अकेले न होते’

एखाद्याची कदर करणं हा चांगुलपणाचा भाग असतो. दुसऱ्याकडे दुर्लक्ष करणं, चुकीच्या पध्दतीने वागवणं, त्याच्या भावनांची कदर न करणं या सगळ्या बाबी आपल्या वृत्तीला दोष दर्शवून देतात. अशा वागणुकीमुळे आपण दुसऱ्याची नाही तर स्वत:ची किंमत कमी करत असतो. आपल्या दुर्वर्तनाचा दाखला देत असतो. कारण बरेचदा दुसऱ्याकडे बघण्याचा आपला दृष्टीकोन पुर्वग्रहदूषित असतो. डोळ्यांवर असा गैरसमजाचा चष्मा असेल तर एखाद्या सच्चा माणसाकडे बघण्याची आपली दृष्टीही अत्यंत सदोष असू शकते.

आपण एकटेच बरोबर आणि बाकीचे सगळे चुकीचे असं कधीच होत नसतं. इथे या कवीला कदाचित अशीच चुकीच्या दृष्टीने आपल्याकडे पाहणारी माणसं भेटली असावी. म्हणूनच तो स्वत:विषयी थोड्या मोकळेपणाने व्यक्त होतोच. इथे त्याच्या मनातली हलकशी नाराजी दिसतीये पण ती बोचरी नाही हे महत्वाचं !

**कु. ललिता उईके**

बी.ए. भाग ३

# चारोळ्या

पाऊस आणि 'आठवण'
यांच घट्ट नातं आहे 'फरक' फक्त
'एवढाच' आहे पाऊस 'शरीराला' भिजवतो तर
आठवण 'मनाला' भिजवते.

कु. दुर्गा डोईफोडे
बी.ए. भाग १

जी माणसं हविसी वाटतात
ती माणसं भेटत नाहीत
जी माणसं नकोसी वाटतात
त्याचं सहवास संपत नाही

कु. कल्याणी काळकर
बी.ए. भाग १

गोड माणसाच्या आठवणीने
आयुष्य कसे गोड बनत गेले.
दिवसाची शुरुवात अशी गोड झाल्यावर
नकळत ओटांवर हास्य केव्हा खुले.

कु. कोमल शिंगणजूळे
बी.ए. भाग २

काही शब्द नकळत कानावर पडतात.
कोणी दूर असूनही उगाच जवळ वाटतात
खर तर ही मैत्रीची नाती अशीच असतात.
आयुष्यात येतात आणि आयुष्यच बनून जातात.

निखील काकडे
बी.ए. भाग २



ना कुणाशी स्पर्धा असावी
ना कुणाशी पुढे
जाण्याची आकांक्षा असावी
फक्त स्वत:ला सिध्द करण्याची जिद्द असावी.

कु. धनश्री राजगुरे
बी.ए. भाग ३

अंदाज चुकीचा असू शकतो पण अनुभव
कधीच चुकीचा असू शकत नाही कारण ...
अंदाज आपल्या मनाची कल्पना आहे
तर अनुभव आपल्या जीवनातील सत्य आहे.

कु. राखी डोईफोडे
बी.ए. भाग ३

बोलता-बोलता गप्प व्हावे
ते शब्द ओळातले आणि
हसता हसता विसरावे ते
दु:ख जीवनातले

कु. स्नेहल मुळे
बी.ए. भाग ३

एवढ्याशा आयुष्यात खूप काही हवं असतं
पण हवं तेच मिळत नसतं
हवं ते मिळलं, तरी खूप काही कमी असतं
चांदण्यांनी भरुन सुध्दा आभाळ रिक्त असतं.

कु. पूजा चिरडे
बी.ए. भाग ३

ठरवलं ते प्रत्यक्षात होतेच असं नाही
आणि जे होते ते कधी ठरवलेलच असते
असही नाही ....
यालाच कदाचित 'आयुष्य' म्हणतात.

कु. निकिता घाटे
बी.ए. भाग ३

लोकांनी मला विचारलं, ''तू''
खूप बदललास रे ...... 'मी' सहज
उत्तर दिले ...... 'लोकांच्या'
आवडी नुसार जगणं सोडलं आहे.

सद्दाम शहा
बी.ए. भाग ३

तुमच्या कडून चुका होत
नसतील तर तुम्ही फक्त
सोप्या गोष्टीवर काम करत
आहात. ही सर्वांत मोठी चूक आहे.

विपीन कोठार
बी.ए. भाग ३

मोर नाचतांना सुध्दा रडतो
आणि राजहंस मरताना सुध्दा गातो
दु:खाच्या रात्री झोप कुणालाच लागत नाही
आणि सुखाच्या आनंदात कुणीही झोपत नाही
यालाच जीवन म्हणतात.

कु. वैष्णवी फाळके
बी.ए. भाग २



जेव्हा मायेची आणि प्रेमाची माणसं
आपल्या जवळ असतात.
तेव्हा दु:ख किती ही मोठं
असलं तरी त्याच्या वेदना जाणवत नाहीत.

कु. समीक्षा कापडे
बी.ए. भाग २

प्रत्येकाच्या आयुष्यात
अशी वेळ नक्की येते.
जेथे कोणाच्या सल्ल्याची
नव्हे तर कोणाच्या तरी
सोबतीची गरज असते.

कु. प्रियंका तायडे
बी.ए. भाग ३

न संपणारे मनी स्वप्न असावे.
न बोलता ऐकू येईल असे शब्द असावेत.
ग्रीष्मात पाऊस पडेल असे ढग असावेत आणि
न मागता साथ देईल असे मित्र असावेत.

कु. गौरी खरीपकार
बी.ए. भाग २

परक्याना ही आपलंस करतील
असे गोड शब्द असतात
शब्दानाही कोड पडाव अशी
काही गोड माणस असतात.
किती मोठ भाग्य असतं
जेव्हा ती आपली असतात.

कु. रेखा शेगोकार
बी.ए. भाग २

तलाव जेव्हा पाण्याने भरतो
तेव्हा माझे किड्यांना खातात.
तलाव जेव्हा कोरडा असतो
तेव्हा किडे माश्यांना खातात.

वैभव नागापूरे
बी.ए. भाग २

घरात काळोख शिरेल म्हणून
मी सगळी दारं लावून बसलो
आणि स्वत:च्या खुळेपणावर
अंधारात बसून हसलो.

पवन राऊत
बी.ए. भाग २

गावातले सगळे रस्ते
रात्री गावाबाहेर पडतात
मला घरीच परतायचं असतं
पण ते मला रानात नेऊन सोडतात.

अक्षय बनसोड
बी.ए. भाग २

ओळखीच्या माणसाने
ओळखल्या सारखं वागायचं
कारण शोधून बोलण्यापेक्षा
कारणाशिवाय बोलायचं

कु. पार्वती पवार
बी.ए. भाग २



आभाळ बरसताना
सरळ दार लावून घ्यावं
नाही तर स्वत:ला
दिशाहीन जाऊ दयावं

विजय गायकवाड
बी.ए. भाग २

मला एक सुखी माणूस
त्याची दु:ख सांगत बसला
आणि माझा दाटून आलेला
अश्रू मी निमुटपणे पुसला.

स्वाती बैस
बी.ए. भाग २

तू क्षितिजासारखा ....
जवळ यायला लागलं की लांब राहतोस
आणि यायचं थांबलं की
आशेने पाहतोस.

कु. भावना मानकर
बी.ए. भाग २

विस्कटलेल्या नात्यांना जोडायला
प्रेमाची गरज भासते
विखुरलेल्या माणसांना शोधायला
विश्वासाची साथ लागते
प्रत्येकाच्या जीवनात येतात वेगवेगळी
माणसं पण पाहिजे ती व्यक्ती
भेटायला मात्र नशिबचं लागते.

वेदप्रकाश शुक्ला
बी.ए. भाग ३

# विनोद

बायको :- इस्त्री करताना माझ्या हातून तुमचा निळा शर्ट जळाला.

नवरा :- अगं एवढं काय त्यात ! काही हरकत नाही. माझ्याकडे अगदी तसाच आणखी एक शर्ट आहे.

बायको :- माहीत आहे मला. म्हणून तर त्या शर्टचा तेवढाच तुकडा कापून मी या जळालेल्या शर्टला जोडला आहे.

**सचिन थोटे**
बी.ए. भाग १

एका रेल्वेच्या डब्यामध्ये एक प्रचंड जाड माणूस बसलेला होता. तेवढ्यात तिथे बंडोपंत गेले. त्यांनी ऊत्साहितपणे त्याला विचारलं, 'हा डबा हत्तीसाठी राखी आहे का ?' तो जाड माणूस प्रचंड संतापला; पण त्यानं तितक्याच उत्तर दिलं, असं काही नाही, माकडंही या डब्यात बसू शकतात.

**समीर वानखडे**
बी.ए. भाग १

मीना :- काय हो सरिता वहिनी, दोन दिवसांपासून तुमची रिना शांत दिसतीये. तिच्या चेहऱ्यावरचं तेज हरपलं आहे .... काय होतंय तिला ?

सरिता :- काही नाही हो, दुरुस्तीसाठी तिचा मोबाईल दुकानात दिलाय. पण व्हॉट्स ॲप नसल्यामुळे तिला सगळ्याच व्हिटॉमिन्सचा तुटवडा जाणवतोय ..... त्यामुळे खंगलीय बिचारी !!!

**अनिकेत घाटे**
बी.ए. भाग १

बंड्या सांग बरं, आपल्या देशाला खरचचं बुलेट ट्रेनची गरज आहे का ?

बंड्या अरे यार, बुलेट ट्रेन अशा देशांसाठी योग्य आहे जिथे लोकांना वेळेची कमतरता भासते, आपल्या देशात लोकांकडे वेळच वेळ आहे. कुठे जेसीबीने काम सुरु असलं तरी अर्धा गाव पहायला येतो आणि ड्रायव्हरला रिव्हर्स घ्यायचा असेल तर येऊ दे .... येऊ दे म्हणून ओरडतो.

**योगेश बरगट**
बी.ए.भाग १

नातू :- हॅलो आजी, इंद्रजित बोलतो

आजी :- कोण बोलतोय, नीट ऐकू येईना

नातू :- इंद्रजित बोलतोय म्हटलं

आजी :- इंग्रजीत नको बाबा मराठीतच बोल.

**अभिजीत बेलुरकर**
बी.ए. भाग १

एका दिवशी संध्याकाळी बायकोने त्याला खूप म्हणजे खूपच धुतला.

कारण अगदी साधं होतं

त्याने देवासमोर दिवा आणि उदबत्ती लावताना बायकोकडे पाहिलं आणि एवढेच

म्हटलं घरातली विडा पिडा बाहेर जावो
बाहेरची लक्ष्मी घरात येवो !

**अक्षय सरदार**
बी.ए. भाग १

लग्नानंतर बायका नवऱ्यांना कशा हाका मारतात.
त्यात कसा बदल होत जातो पहा.
वर्ष पहिले – अहो
वर्ष दुसरे – अहो, ऐकलंत का ?
वर्ष तिसरे – अहो, बंटीचे बाबा
वर्ष चौथे – अहो बहिरे झालात काय
वर्ष पाचवे – कान फुटलेत की काय तुमचे
वर्ष सहावे – इकडे येतात की मी येऊ तिकडे
यापुढील वर्ष – कुठे उलटलाय हा माणूस देव जाणे.

**श्रीधर देशमुख**
बी.ए. भाग १



## एस.एम.एस.

आयुष्य असतं
Visiting कार्ड,
बायको असते.
Memory कार्ड,
नवरा असतो.
ATM कार्ड,
मैत्रीण असते.
Debit कार्ड,
शेजाऱ्याची बायको असते,
Greeting कार्ड,
बायकोची बहिण असते.
Recharge कार्ड,
आई-वडिल असतात.
PAN कार्ड,
आपली मुले असतात.
Identy कार्ड
पण
आपले जिवलग मित्र असतात.
Aadhar कार्ड,
म्हणून Aadhar कार्ड सांभाळून ठेवा.

**अक्षय बनसोड**
बी.ए. भाग २

# हिंदी विभाग

# तुलसी के साहित्य मे पर्यावरण चेतना



**कु. स्नेहल जा. मुळे**
बी.ए. भाग ३

प्राचीनकाल में पर्यावरण जीवन के सभी क्षेत्रो को प्रभावित करता था और आज भी यह मानव जीवन को प्रभावित करता है । मनुष्य और प्राणियों का जीवन इसी पर निर्भर है । अत: पर्यावरण की रक्षा और सुरक्षा करना हमारा परम कर्तव्य है । आज पूरा विश्व पर्यावरण की समस्या से जूझ रहा है । इसका कारण यह है की इंसान भौतिकवाद में अंधा बनकर नाना प्रकार की यातनाएँ भोग रहा है । विश्व के विचारकों का यह विश्वास है की प्राचीन भारतीय संस्कृति ही मानवता की रक्षा कर सकती है । तुलसी का वाड्मय आज के समय मे पर्यावरण की समस्या के निवारण की दृष्टी से एक सही मार्ग हो सकता है । जिस पर चलकर मानव ही नहीं सभी पृथ्वीथल के जीवन-जंतूओ की रक्षा की जा सकती है ।

प्राचीन भारतीय पूराण एवं ग्रंथो की रचना वन प्रान्तरों मे हूई है । प्राचीन काल में वनों को संरक्षित रखा जाता था, इसलिए आज भी जंगल मे मंगल लोकवाणी प्रसिद्ध है ! तूलसी प्रकृति से प्रेम करते थे । प्रकृति का सौंदर्य उन्हें मुग्ध करता था अत: चित्रकूट के प्रसंग मे वे कहते हैं –

चित्रकूट अति विचित्र, सुंदर वन महि पवित्र पार्वती भय-सारित सकल मल निकदमी । झरना झर झर झिंग-झिंग-झिंग जलतर गिनी । बर बिहार चरन चारु पांडर चपक चनार, करनहार बार-बार पूर-परगिनी । जोबन नव ढरत दार दूत मत मृग मराल
मंद-मंद गूंजत हैं अति अलिं गिनी । अछाय अकलकन सरद चंद चाँदनी ।।

इस तरह तूलसी ने चित्रकूट के वन की सुंदरता को बडे ही सुंदर ढंग से बताया है । पृथ्वी की पवित्रता गंदगी को नष्ट करनेवाली, तथा झिंग-झिंग करते बहती नदी कर मनोहारी चित्रण किया है ।

पर्यावरण के सौंदर्य, पशु-पक्षी, शीतल झरने, मंद-मंद बयार, मंदाकिनी नदी बेहद आकर्षिक करती हैं । तुलसी कवितावली में एक स्थल पर कहते हैं –

जहाँ बन पावतनों, सुहावनों विहग मृम
देखी अति लागत आनंद खेत खूँट सो ।।
झरना-झरत, द्वार सीतल पुनीत बादि ।।
मंदाकिनी मंजूल मेहस जटाजूट सो ।।
तुलसी जौ राम सौं सनेहू साँ-वो-चाहिए तो,
से इये सनेह-सो विचित्र चित्रकूट सो ।।

तुलसी वृत 'रामचरित मानस' में अयोध्य, जनकपुर, और लंका तीनों नगरों में वन संरक्षण और संवर्धन पर जोर दिया गया है । तुलसी कहते हैं –

तुलसी तरुवर विविध सुहाय ।
कहू सीता कहू लखन लगाए ।

इससे पता चलता है कि प्राचीन काल में पेड़ पौधों के लगाने उसके संवर्धन और संरक्षण का अपना महत्त्व था केवल आम जनता ही नही सीता और लक्ष्मण जैसे राजघराने के लोग भी वृक्षारोपन का कार्य स्वयं के हाथों से करते थे । केवल राजवाटिका में ही नहीं बल्कि नगर के सभी लोगों ने अपने घरों मे, घर के बाहर फुलवारियां लगाई हैं । सुंदर-सुंदर बेले सदैव वसंत की तरह फूलती रहती है –

सुमन वाटिका सबहि लगाई ।
विविध भाँति कर यतन बनाई ।
लता-ललित बहू भाँति सुहाई ।
फूलही सदा बसंत की नाई ।

तूलसी ने प्राचीन नगररचना कहां के घाट और घाटों के किनारे-किनारे पर देवी-देवआतों के मंदिर है और उसके चारों और बाग है -

तीर-तीर देवन्ह कर मंदिर ।
चहूँ दिशी तेहि के उपवन सुंदर ।।

जनकपूर प्राकृतिक सौंदर्य की खान है । यहां के राजमहल, घर, मंदिर, किनारे और उसके आसपास फल और फुलों की वाटिकाएँ लगाई हूई हैं । आस-पास वन है जो पल्लवित और हरे भरे पत्तों से सुशोभित हैं ।

सुमनवाटिका बाग वन, विपूल विहग निवास
फूलत पुलत, सुपल्लवित सोहतपूर चहूँ पाया ।

पर्यावरण का यह सौंदर्य केवल जनकपूरी या अयोध्या में ही नही बल्कि लंका में भी अत्यंत शोभायमान और मुग्ध करनेवाला है । जिस प्रकार स्वयं लक्ष्मण और सीता पौधे लगाते हैं उन्हें सींचते है उससे पता चलता है कि उनके हृदय में प्रकृति के प्रति कितना प्रेम और सम्मान है । ऐसा ही प्रकृति के प्रति प्रेम रावण को भी है । रावण की लंका नगरी में रावण की वाटिका वसंत ऋतु की शोभा बढाने वाला थी । वहां की बावडी, तालाब, और बाग की बनकर देखकर हनुमान जैसे वैरागी भी राग से वशीभूत हूए बिना नहीं रह पाये ।

वासव वरुण विधी बनते सुहावनो,
दसाननु को काननु बसंत का सिंगारु सो ।।
समय पुराते पात परत डरत पातु,
पालत लालत रति मारको विहारु सो ।।
देख वरवाटिका तडाग बाग को बनाऊ,
रागबस भो विरागी पवन कुमारु सो ।।

तुलसीदास आगे लंका के पर्यावरण को लेकर रावन के मन में जो प्रेम है वह अनन्य है । रावन को बाग अपने प्रिय पुत्र मेघनाद के सदृश्य प्रेम था -

माली मेघमाल बनमाल विकराल भट,
नीके सब काल सींचे सुधा सार नीर कें ।।
मेघनाद से दुलारों प्राण ते पियारों बाग
अति अनुरागु, जिये जानुधार धीर के

इससे पता चलता है कि तुलसी प्रकृति या पर्यावरण का महत्त्व अपनी कृतियों में बार-बार दर्शाते हैं । चाहे रावण हो, सीता हो, हनुमान हो या लक्ष्मण या अन्य आम नागरिक सभी पर्यावरण से बेहद प्रेम करते है । सीता जगह-जगह विभीन्न प्रकार के पेड लगाती है, वही लक्ष्मण उन पेडों की देखभाल करते हैं । हनुमान लक्ष्मण की जान बचाने के लिए पूरा द्रोणाचल पर्वत उठाकर लाते हैं और काम होने पर यथास्थल रखने का काम नहीं भूलते । वनस्पतियों का मनुष्य और प्राणियों के लिए कितना महत्त्व है, यह भी तूलसी ने बताया है । कई प्रकार की औषधियों का जिक्र रामचरित मानस मे किया गया है । आज भी कई वनस्पतियां हमारे स्वास्थ्य के लिए औषधियों के रुप मे कार्य करती है । पेड पौधो से मौसम मे संतूलन बना रहता है । शुद्ध हवा भरपूर मात्रा मे बारिश पेड-पौधों के चलते हमें मिलती है, लेकिन अज्ञानवश और स्वार्थ के लिए हम पर्यावरण को नष्ट कर रहे है जिसके चलते प्रदूषण अधिक तपन का सामना करना पड रहा है । नदिया सूख रही हैं । वनस्पतियां अब नहीं रही । उनकी जगह क्रांकीट के जंगलो ने ले ली है । अगर मनुष्य को बचना है तो पर्यावरण को बचना एकमात्र उपाय है । जिसमें तुलसी का काव्य हमारे समक्ष सबसे बडा आदर्श है ।

*****

# आज की नारी



कु. धनश्री ग. राजगुरे
बी.ए. भाग ३

नारी यह प्रकृति की अनमोल देन है । नारी मनुष्य जीवन का मूलाधार है । इसलिए नारी शब्द सुनते ही हमारे मन मे आदर की भावना जाग उठती है । नारी त्याग, श्रध्दा, माया, ममता की मूरत है । कई कठिनाइयाँ और दमन के बावजूद आज नारी अपनी हिम्मत और संघर्ष के बलपर संपूर्ण विश्व के केंद्र में है । नारी आज जीवन के प्रत्येक क्षेत्र मे सफलता का परचम लहरा रही है । वह किसी भी क्षेत्र मे पुरुष से कमतर नहीं है । नारी मनुष्य जीवन का मौलिक रत्न है, जिसने स्वयं को तराशा है । व्यवस्था की भट्टी में तपकर आज वह पूरे समाज को अपना प्रकाश पहूँचा रही है । पहले वह चार दिवारी में रहकर घर गृहस्थी का धर्म निभाती थी, परंतु शिक्षा के चलते उसका दायरा व्यापक हो चूका । उसने घर के बाहर जाकर परिवार का भार अपने कंधेपर लेकर यह सिद्ध कर दिया है कि परिवार, समाज और देश की आर्थिक उन्नति में भी बराबरी का कार्य कर रहि है । जिस्मानी तौर पर अधिक वजन उठाने की बात को छोड दिया जाय तो वह पुरुष से किसी भी क्षेत्र में लोहा ले सकती है । लेकिन इसके बावजूद दिन-ब-दिन उसकी समस्याएँ बढती जा रही है । आज भी हमारी पुरुषसत्ताक व्यवस्था में उसका दर्जा दोयम है । उसे इंसान कम और वस्तू अधिक समझा जाता है । परंपरागत सामंती सोच में आज भी उसके पैरो में जंजीरे डाल न रखी हैं । परन्तू आनेवाले समय में नारी निश्चित रुप से न समस्याओं पर विजय प्राप्त करेगी इसमें कोई शक नही है । घर के बार निकलने के कारण उसपर पहले से अधिक हमले हो रहे है, लेकिन नारी हार नहीं मानती । वह आज संघर्ष के लिए तत्पर है । सवाल यह है कि नारी गुणों की दृष्टि से पुरुष से भी अधिक सक्षम होने के बावजूद पीडीत क्यो है ? प्रेमचंद ने नारी के गुणों की विशिषता को देखकर ही उसे देवी का दर्जा दिया है । वही प्रसाद नारी को श्रध्दा स्वरुप देखते है । स्त्री श्रध्दा और सम्मान आज की जरुरत है ताकि वह देश की उन्नति में अपनी सर्वोत्तम भूमिका अदा कर सके । ऐसा होने के लिए केवल राजनीतिक, धार्मिक या सामाजिक स्तरपर ही नही बल्कि पारिवारीक स्तर पर प्रयास करने होंगे, क्योंकी यही वह पहली पाठशाला है, जहां लडकी को सबसे पहले अपने दोयम होने का अहसास दिलाया जाता । लडकों की तुलना में उसे छोटा या कम समझा जाता हैं । लडकी को सबसे पहले अपने दोयम होने का अहसास दिलाया जाता । लडको की तुलना मे उसे छोटा या कम समझा जाता है । लडकी को बोझ और लडको को कुलदीपक समझा जाता है । खानपान से लेकर, स्वतंत्रता और शिक्षा में भी उसको लडको की तुना में दोयम समझकर सुविधा दी जाती है । यहां तक कि नौकरी और शादी के समय लडकी पर माता-पिता कम खर्चा करते हैं, वहीं लडकों पर कर्जा लेकर भी पैसा लुटाया जाता है । और बेचारी लडकियां अपने माता-पिता की इस नाइंसाफी को जीवनभर बरदास्त करती रहती है । कानून ने लडकी को उसके पिता की संपत्ति पर बराबरी का अधिकार दिया है, परंतू वास्तव में लडकी अगर हिस्सा या अधिकार मांगने की कोशिश करें तो तुरंत उसके परिवारवाले सगे मां-बाप, भाई उससे अपना नाता तोडते है । उसे बदतमीज समझा जाता है ।

अपने माता-पिता, भाईयों को सबसे अधिक प्रेम करनेवाली लडकी अचानक अपना अधिकार मांगने पर शत्रू बन जाती है । ससुराल में अपने अधिकार की बात करनेपर घर के बाहर निकालने की धमकियाँ दी जाती हैं । आज भी कई दृष्ट परिवार चंद पैसों के लिए अपनी बहूओं को जिंदा जला देते हैं ।

घर के लिए मरनेवाली औरत को थोडी-सी इज्जत और थोडे से प्यार के लिए तरसना पडता है । बावजूद इसके कुछ नारियां अपने को कमजोर या गुलाम नही समझती बल्कि अपनी हिम्मत का लोहा दुनिया को मनवा रही है । वह जीवन के प्रत्येक क्षेत्र का हिस्सा बनकर उसमें अपनी कुशलता सिध्द कर रही है और अपना परिवार भी संभाल रही है । इसीलिए तो कहते है कि ''नारी है, कमजोर नही शक्तीका का नाम ही नारी है ।'' इस संदर्भ में रानी लक्ष्मीबाई, झलकारी बाई, जिजामाता इंदिरा गांधी, मदर तेरेसा, सावित्रीबाई फुले, मीरा, कल्पना चावला यह ऐसे नाम हैं जिसने व्यवस्था की छाती मे झंडे गाडकर अपनी कामयाबी और हैसियत का लौहा मनवाया है । देश मे ऐसी कई विरांगणांए हमारे इतिहास में दर्ज हैं जिन्होंने अपने राज्य और देश के लिए हँसते-हँसते प्राण अर्पण किये ।

समाज सेवा के क्षेत्र में आज भी मेघा पाटकर, सिंधूताई सपकाळ, डॉ. राणी बंग, डॉ. मंदाताई आमटे जैसी कई महान नारियों ने समाजसेवा का अभियान चला रखा है । मेघा पाटकर आज भी 'नर्मदा बचाव' अभियान के साथ-साथ आदिवासीयों की रक्षा और उनके सुधार के लिए तत्पर है । सिंधूताई सपकाळ अनाथ बच्चों की माता बनकर उनकी सेवा कर रही है । ठीक वैसे ही जैसी सावित्रीबाई फुले ने की थी । मंदाताई आमटे भी आदिवासी और कुष्ठरोगियों की दिनरात सेवा कर अपनी योग्यता क्षमता और मानवता का परिचय दे रही है ।

क्रीडा क्षेत्र में तो दर्जनों महिलाएं पूरी दुनिया मे देश का नाम रोशन कर रही है । क्रीडा के प्रत्येक क्षेत्र में उसने अपनी छाप छोडी है । क्रीडा का नाम लेते ही पी.टी.उषा (पद्मश्री पुरस्कार), सानिया मिर्जा (पद्मश्री), पी.वी. सिंधू (बॅडमिंटन), सुनीता रानी, शायनी अब्राहम, मेरी कोम, अंजुम चोपडा, बुला चौधरी, कविता राऊत, कोनेरु हम्पी, कर्नम मल्वेश्वरी, जे.जे. शोभा, मधूमिता विश्व, कृष्णा पूनिया, कृष्णा पाटील ऐसे अनेक नाम हैं, जो देश गौरव बढा रही है ।

राजनीती में इंदिरा गांधी सबसे बडा नाम है, इनके बाद प्रतिभाताई पाटील, मायावती, जयललिता, सुषमा स्वराज, रीता बहुगूणा, स्मृती इराणी, रुपा गांगूली, जयाप्रदा और अन्य कई महिलाएं राजनीति के क्षेत्र में अपना वर्चस्व रखती है । देश चलाने की क्षमता उनमें है, यह बात और है कि इंदिरा गांधी के बाद चालाक सुराजियों में नारी को प्रधानमंत्री बनने नहीं दिया । फिर भी दिन-ब-दिन नारियां इस क्षेत्र मे आगे आ रही है ।

साहित्य के क्षेत्र में आधूनिक यूग मे पुरुष के अधिकार के इस क्षेत्र में प्रवेश कर अपनी मजबूत पकड बनायी है । उसने यह सिद्ध कर दिया है कि वह प्रतिभा में पुरुष से बिल्कुल कम नही । अपने अपने तरीके से स्त्री विमर्श को चला रखा है । इनमें महादेवी वर्मा के बाद मन्नू भंडारी, कृष्णा सोबती, ममता कालिया, सुधार अरोरा, निरुपमा सेवती, आदि दर्जनों नारियों है जो सृजनकार्य मे अपनी भूमिका अदा कर साहित्यिक और सांस्कृतिक क्षेत्र में योगदान दे रही है ।

इसके साथ ही कला का सर्वाधिक प्रभावशाली क्षेत्र सिनेमा में नारी आज पुरुष के बराबर काम कर रही है । वह पुरे साहस और हिम्मत से चूनौतीभर भूमिकाओं का निर्वाह कर रही है । वह मात्र कठपुतली नही बल्कि अपनी मर्जि से सिनेमा मे काम करती है । और किसके साथ अभिनय करना या नही इसका फैसला लेती है ।

इस तरह आज भी नारी अत्यंत प्रतिभाशाली और संघर्षशील, कभी हार न माननेवाली नारी बन चूकी है। वह अब अपने फैसले स्वयं करने लगी है । हाँ कई बाते आज भी स्त्री को दबाकर रखती है, परंतू लडते रहना उसका स्वभाव होने के कारण उसके प्रवाह को रोक पाना अब मुश्किल है ।

******

# डॉ. बाबासाहेब आम्बेडकर का ग्रंथप्रेम

**कु. पुजा म. चिरडे**
बी.ए. भाग ३



भारतीय संविधान के निर्माता, भारतरत्न डॉ. बाबासाहब अम्बेडकर बहूआयामी व्यक्ति थे । समाजसुधारक, अर्थतज्ञ, विचारवंत, तत्वज्ञानी, प्रखर बुद्धीवादी, विज्ञाननिष्ठ, बोधीसत्व, अखंड मानवतावादी, समतावादी, बंधूत्व एवं न्याय के पुरस्कर्ता, शोषित, पीडीत बहूजनों के लोकनेता, शिक्षातज्ञ, साहित्यीक, पत्रकार आदि कई आयाम बाबासाहब के व्यक्तित्व को महान बनाते हैं ।

'ग्रंथप्रेमी बाबासाहब' यह उनके व्यक्तित्व को महान बनानेवाला एक अलग और महत्वपूर्ण पहलू है । ग्रंथो के प्रति बाबासाहब के मन में विशेष प्रेम था । ग्रंथो को वे अपना सच्चा साथी मानते थे, गुरु मानते थे। बचपन से उन्हें पढने की आदत पड गयी थी । पुस्तकों के प्रति उनका प्रेम देखकर उनके पिता को बडा आश्चर्य होता था । अपने पुत्र भीमराव की पुस्तक पढने की इच्छा पूर्ण करने के लिए सुभेदार रामजी अम्बेडकर हर हाल में अपने बालक भीमराव के लिए पुस्तकें खरीदकर ले आते थे । अपने बेटे की पढने की प्यास बुझाने के लिए सदैव तत्पर रहते थे और उनकी ज्ञान की लालसा को पूरा करनेवाले आदर्श पिता थे । उनका पुस्तको के प्रति प्रेम देखकर उनके गुरुजनों को उनपर बडा अभिमान होता था । महाविद्यालयीन दशा में रात-दिन पढनेवाले भीमराव के बारे में उनके गुरुजन कहते हैं - ''महाविद्यालयीन जीवन मे रात-दिन पढनेवाला मनन, चिंतन करनेवाला ऐसा अद्वितीय विद्यार्थी हमने अपने पूरे जीवन मे नहीं देखा ।''

विद्यार्थी-जीवन में अर्जुनराव केळुसकर जैसे आदर्श शिक्षक मिले थे जिन्होंने कई किताबे उन्हें पढने के लिए दी । उनके द्वारा स्वयं लिखी हूई 'भगवान बुद्धाचे चरित्र' यह पुस्तक दसवी पास होने के बाद भीमराव अम्बेडकर को उनके सत्कार के समय भेट दी थी । उच्च शिक्षा के लिए जब बाबासाहब विदेश गये, तब अठारह घंटो तक के पढाई करते थे । कई बार तो उससे भी अधिक समय ग्रंथालय मे व्यतित करते थे । ग्रंथालय के लगभग सभी किताबो को उन्होने पढ लिया था । वे किताब पढने बैठ जाते थे, तो उन्हें समय का पता ही नही चलता था ।

बाबासाहब ने भारत वापस आकर मुंबई में घर बनाया था, वह केवल पुस्तकों के लिए । उनके ग्रंथालय मे अलग-अलग विषय के चव्वालीस हजार पुस्तकों का संग्रह था । पूरे विश्व में ग्रंथो पर प्रेम करनेवाला ऐसा ग्रंथाप्रेमी मिलना असंभव है । आचार्य अत्रे उनके घर एक बार उनको मिलने गये थे, वहां उन्होंने बाबासाहब का ग्रंथप्रेम और लगन देखकर सदा के लिए उनके मित्र बन गये ।

